श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

# बाणगंगा

**अंक ११ वा**

**सन २०१९-२०२०**

संपादक
**डॉ. विजय जाधव**
प्राचार्य

कार्यकारी संपादक
**डॉ. भाऊसाहेब मुळे**

*** संपादक मंडळ ***

प्रा. डॉ. शेख राजमोहंमद
प्रा.डॉ. पुंडे मनिषा
प्रा. गाडे त्रिवेणी
प्रा. साठे भास्कर
प्रा. झोंड सचिन
प्रा.डॉ.सौ. कीर्तने वर्षा
प्रा. काळे वर्षा
प्रा. मोहिते चेतना
प्रा. जाधव किरण

प्रकाशक

**डॉ. विजय जाधव**

प्राचार्य

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

---

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेले लेख, कविता यातील मते संबंधित लेखक, कवींची आहेत.
या मताशी संपादक मंडळ, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही.

# श्री बाणेश्वर शिक्षण संस्था

## * विश्वस्त व कार्यकारी मंडळ *

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | **श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले** | अध्यक्ष |
| २ | **श्री. महादेव हरिभाऊ जाधव** | उपाध्यक्ष |
| ३ | **श्री. गोरखनाथ दौलत साठे** | सचिव |
| ४ | **श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ** | सहसचिव |
| ५ | **श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले** | खजिनदार |
| ६ | **श्री. बाळासाहेब त्र्यंबक वाघ** | सदस्य |
| ७ | **मा. अक्षय शिवाजीराव कर्डिले** | सदस्य |
| ८ | **श्री. जनार्दन राधाकिसन कर्डिले** | सदस्य |
| ९ | **श्री. उत्तम चिमाजी जाधव** | सदस्य |
| १० | **श्री. भाऊसाहेब गंगाधर कर्डिले** | सदस्य |
| ११ | **श्री. प्रकाश कुंडलिक कर्डिले** | सदस्य |

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. गोरखनाथ दौलत साठे | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. विजय मच्छिंद्र जाधव | सचिव |
| ४) | श्रीमती चेतना प्रमोद माहिते | सदस्या |
| ५) | डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे | सदस्य |
| ६) | डॉ. राजमोहंमद हसन शेख | सदस्य |
| ७) | प्रा. सौ. मनिषा नारायण पुंडे | सदस्या |
| ८) | सौ. शैला गिरीष साठे | सदस्या |
| ९) | श्री. काशिनाथ मारूती हापसे | सदस्य |
| १०) | सौ.डॉ. संध्या लक्ष्मण भंगाळे | सदस्या |
| ११) | श्री. बबन रमेश वाघमारे | सदस्य |
| १२) | मा. अक्षय शिवाजीराव कर्डिले | सदस्य |
| १३) | प्रा. वर्षा अविनाश काळे | सदस्या |
| १४) | श्री. महेश बाबासाहेब कर्डिले | सदस्य |

# प्राचार्यांचे मनोगत....

विद्यार्थी बंधू-भगिनींनो,

बाणगंगा या वार्षिक नियतकालीकाचा दहावा अंक आपल्या हाती देतांना व त्याव्दारे आपणाशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत बुऱ्हाणनगरचे आराध्यदैवत आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने शैक्षणिक विचारांची शिदोरी बरोबर ठेवत बहुजन समाजाच्या उध्दाराचे स्वप्न उराशी बाळगुन मा. आ. शिवाजीराव कर्डिले यांनी १९८९ साली श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच ज्ञानाची गंगोत्री बुऱ्हाणनगरमध्ये प्रवाहित केली. प्राथमिक,माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची वन वन थांबवून शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केली व अल्पावधीतच या संस्थेने मोठी प्रगती साधली याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री बाणेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय होय.

जुन २००४ मध्ये अवघ्या ५७ विद्यार्थी व ६ प्राध्यापकांवर सुरु झालेल्या या महाविद्यालयात सध्या ११५६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ३२ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत.

बदलत्या प्रवाहाचा मागोवा घेत महाविद्यालयाने पारंपरिक उच्च शिक्षणाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. नवनवीन अभ्यासक्रमाव्दारे उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता टिकवत असतानांच ग्रामीण भागातील आमचा विद्यार्थी खासगीकरणाच्या युगात २१ व्या शतकात आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे. ही भूमिका स्वीकारुन यासाठी आम्ही आवश्यक ती कौशल्ये, मुलाखत तंत्र, सामान्य ज्ञान, सॉफ्टस्कील डेव्हलपमेंट प्रोग्राम सारखे उपक्रम राबवित आहोत. ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे, त्यांच्यात श्रमसंस्कार रुजावेत, यासाठी ‘कमवा व शिका’ योजनेंतर्गत शिक्षण पूर्ण करण्याची संधी महाविद्यालयाने दिली. या बरोबरच विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सर्व योजना व उपक्रमांमध्ये महाविद्यालय सहभागी होऊन नव भारताचे भावी आधारस्तंभ सक्षम करण्याचा महाविद्यालय प्रयत्न करीत आहोत.

या वर्षीचा ‘बाणगंगा’ हा दहावा अंक साकार करण्याचा आम्ही प्रयत्न केला. संस्थेच्या सहकार्याने प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे या अंकाची निर्मिती झाली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्यीक गुणांना वाव देण्यासाठीचे चांगले व्यासपीठ आहे व त्यात विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी होतात,हे पाहून आनंद वाटतो.

अशा या बाणगंगाच्या दहाव्या अंक निर्मितीसाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्तींनी सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

धन्यवाद !

- डॉ. विजय जाधव

प्राचार्य

# संपादकीय...

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव कर्डिले व इतर संचालक मंडळ यांनी सन १९८९ साली केली. या माध्यमातून सर्वप्रथम माध्यमिक शाळा सुरु केली. नंतर  उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु केले. पंचक्रोशीतील इतरही ठिकाणी शिक्षणाची गरज पाहता त्याही ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु केल्या.

उच्च शिक्षणाची मागणी आणि विशेषत: मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या संस्थेने सन २००४ साली श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक गरीब मुलामुलींना, उपेक्षित घटकातील व खेड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळू लागले. या शिक्षणातून सर्वच घटकातील विद्यार्थ्यांचे जीवन समृध्द होण्यास मदत होत आहे हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीतून सिध्द होताना दिसते.

महाविद्यालयीन युवक हा उद्याच्या पिढीचा सुजाण नागरिक असतो. उच्च शिक्षणाने त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतात. समाजात घडणाऱ्या घटनांकडे तो स्वत:च्या नजरेने पाहत असतो आणि त्याचा अन्वयार्थ स्वत:च लावण्याचा प्रयत्न करीत असतो. या महाविद्यालयीन युवकांपुढे अनेक प्रकारचे माहितीचे मायाजाळ आहे. त्याच्या भोवती घडणाऱ्या सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक आणि वैयक्तिक घटनांचा त्याच्यावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होत असतो. या घटनेच्या निरीक्षणातून त्याची वैचारिक बांधणी होत असते. हाच विचार शब्दबध्द करण्याचा अनेकदा तो प्रयत्न करीत असतो. मात्र त्याला व्यक्त होण्यासाठी विचारपीठ उपलब्ध होत नाही. त्याच्या या वैचारिक भावना व्यक्त करण्यासाठीच महाविद्यालयाचे हे नियतकालिक असते.

या नियतकालिकातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या भावभावना लेख, काव्य अथवा छोट्या चुटकुल्यातून व्यक्त केल्या आहेत. वैयक्तिक भावभावनांसोबत सामाजिक, राजकिय, शैक्षणिक विचारांवरही भाष्य व मंथन यात आले असून ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरणारा हा विद्यार्थी, वैज्ञानिक प्रगतीचा शोध बोधपर विचारही या नियत कालिकात मांडू लागला आहे. जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन आपल्या लेखाच्या व कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घडविले आहे.

महाविद्यालयाच्या हा दहावा वार्षिक अंक आहे. या अंकातील विविध लेखांचा आपण आस्वाद घ्यावा हीच सर्व संपादक मंडळाची इच्छा आहे. म्हणूनच हा अंक अधिकाधिक आकर्षक बनविला आहे. या अंकासाठी संपादक मंडळातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेले कष्ट व परिश्रम स्तुत्य आहेत. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो.

कार्यकारी संपादक
प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे,
मराठी विभाग प्रमुख

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर वर्ग २०१९-२०२०

✻ समाजशास्त्र विभाग ✻

डॉ. जाधव व्ही. एम. (प्राचार्य)

✻ मराठी विभाग ✻

प्रा. डॉ. मुळे बी. एम.

प्रा. डॉ. कीर्तने व्ही.एस.

✻ वाणिज्य विभाग ✻

प्रा. गाडे टी.डी.

प्रा. दरेकर ए.व्ही

प्रा. निंबाळकर वर्षा

प्रा. के.एस. जाधव

✻ बी.सी.ए. विभाग ✻

प्रा. वर्षा कर्डिले

प्रा. लांडे प्रशांत

प्रा. दगडखैर वैभव

✻ लेखाधिकारी ✻

श्री. विधाते ए.बी.

✻ परीक्षा विभाग ✻

सौ. शैला साठे

✻ शिष्यवृत्ती ✻

श्री. रविंद्र भालसिंग

श्री. मारुती गाडेकर

✻ लिपिक ✻

श्री. महेश कर्डिले

✻ हिंदी विभाग ✻

प्रा. डॉ. शेख आर.एच.

प्रा. राणी केदार

✻ इतिहास विभाग ✻

प्रा. सोनवणे एस.आर.

प्रा. राणी केदार

✻ बी.सी.एस. विभाग ✻

प्रा. काळे व्ही. ए.

प्रा. तृप्ती बोंदर्डे

प्रा. योगेश ढगे

✻ ग्रंथालय विभाग ✻

प्रा. सचिन झोंड

✻ शिपाई ✻

श्री. कर्डिले एस.वाय.

श्री. नवनाथ साळवे

श्री. योगेश थोरवे

श्रीमती लोखंडे जे.एल.

✻ समाजशास्त्र विभाग ✻

प्रा. नागपुरे योगेश

✻ इंग्रजी विभाग ✻

प्रा. मेघा खोल्लम

✻ भूगोल विभाग ✻

प्रा. साठे बी.जी.

✻ राज्यशास्त्र विभाग ✻

प्रा. खांदवे एस.टी.

✻ क्रीडा विभाग ✻

प्रा.डॉ. पुंडे एम.एन.

✻ बी.एस्सी. विभाग ✻

प्रा. मोहिते चेतना

प्रा. वाघ स्वाती

प्रा. लहारे निलिमा

प्रा. गाडेकर राजेंद्र

प्रा. बांगरे सर

प्रा. लोखंडे मॅडम

प्रा. धर्माधिकारी मॅडम

प्रा. कोमल सोनवणे

प्रा. म्हस्के मॅडम

प्रा. अडसुळे अनिकेत

प्रा. फुंदे प्रियंका मॅडम

प्रा. जावळे सर

प्रा. कराळे सर

प्रा. दिनकर मॅडम

प्रा. गायकवाड मॅडम

# बाणगंगा

## सन २०१९-२०२०

## अनुक्रमणिका


| विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| मराठी | ९ |
| अहवाल | ५९ |

# मराठी विभाग



# युवकांचे स्वामी विवेकानंद

– संकलन : कु. अर्चना गायकवाड

छत्रपती शिवाजी महाराज, शहीद भगतसिंग हे जसे भारतीय युवकांचे प्रेरणास्थान आहेत तसेच स्वामी विवेकानंद देखील भारतीय युवकांचे प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. म्हणूनच देशभरात १२ जानेवारी हा स्वामी विवेकानंदाचा जयंती दिवस 'युवक दिन' म्हणून साजरा केला जातो या दिवशी युवकांनी स्वामी विवेकानंदाच्या विचारांचारा वसा आणि वारसा पुढे न्यावा अशी अपेक्षा असते.

स्वामी विवेकानंद म्हटले की, आपल्या डोळ्यांसमोर भगवी कफनी परिधान केलेल्या व्यक्तीची छबी येते. विवेकानंद म्हटले की, ज्वलंत हिंदुत्वाचे प्रेरणास्थान, भारतातच नव्हे तर जगभरात भारती संस्कृती, अध्यात्म पोहोचवणारा अवलिया अशी विभुषणे लावून त्यांना गौरवले जाते. गेल्या तीन–चार वर्षापासून काही संस्था –संघटनांनी विशेष अभियान राबवत स्वतःच्या सोयीसाठी विवेकानंदांचा केवळ आध्यात्मिक चेहराच समाजासमोर आणण्याचा प्रयत्न चालवला आहे. खरंच विवेकानंद केवळ एक आध्यात्मिक पुरुष होते. त्यांनी केवळ मठांची स्थापना करुन धर्मप्रसारांचेच कार्य केले का ? या प्रश्नांची उत्तरे शोधताना विवेकानंद हे केवळ अध्यात्म आणि धर्मप्रसारक नव्हते, तर शोषणमुक्त समाजासाठी झटणारे, समाजवादी विचारांचा पुरस्कार करणारे एक द्रष्टे समाज सुधारक होते असे आढळेल.

१२ जानेवारी १८६३ साली जन्माला आलेल्या स्वामी विवेकानंदाचे जीवन उलगडून दाखवणारे अनेक चरित्रग्रंथ उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत व शास्त्रज्ञ डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी आपल्या शोध खऱ्या विवेकानंदांचा या पुस्तकात विवेकानंदांच्या विचारांची मांडणी करुन त्यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे या पुस्तकांबरोबरच स्वामी विवेकानंदांनी वेळोवेळी आपल्या शिष्यांना सहकाऱ्यांना लिहिलेली पत्रे अभ्यासली तर त्यांचे नेमके विचार काय होते, याचा उलगडा होण्यास मदत होते.

१ नोव्हेंबर १८९६ रोजी मेरी हिल्स यांना पाठवलेल्या पत्रात विवेकानंद स्पष्टपणे म्हणतात. मी समाजवादी आहे. समाजवाद ही परिपूर्ण व्यवस्था आहे. असे मी म्हणत नाही. पण ही व्यवस्था समाजातील प्रत्येकाची दोन वेळच्या जेवणाची हमी देते व म्हणून ही व्यवस्था मला मान्य आहे.

रशियात १९१७ साली समाजवादी राष्ट्राची उभारणी झाली. त्या अगोदरच २१ वर्षापूर्वी स्वामी विवेकानंद समाजवादी विचारांचा पुरस्कार करत होते, हे ध्यानात घ्यायला हवे. याच वेळी त्यांनी असाही विचार वर्तवला होता की, रशियामध्ये प्रथम कष्टक यांची सत्ता येईल आणि त्या नंतर चीनमध्ये येईल. समाजावादाची लाट कोणालाही रोखता येणार नसल्याने त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते. त्याच वेळी साम्यवादी व्यवस्थेतील उणिवा शोधण्याचाही त्यांनी प्रयत्न केला होता.

सुमारे २१ वर्षापूर्वीच समाजवादी राष्ट्राचे भविष्य वर्तवण्याचे ज्ञान हे विवेकानंदांना काही आध्यात्मिक तपसाधनेतून मिळालेले नव्हते तर त्यासाठी त्यांनी संपूर्ण राष्ट्रातील जगातील घडामोडींचा, समाज जीवनाचा सखोलतेने अभ्यास केला होता. विवेकानंदांनी जेव्हा आपल्या कार्यास सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी त्यांनी ज्या देशात आपल्याला कार्य करायच आहे तो देश स्वतःच्या डोळ्यांनी पाहून समजावून घेण्याचे ठरवले.

त्यानुसार भारतात सुमारे १३ हजार किलोमीटरचा प्रवास करुन त्यांनी देखील समाजव्यवस्था, रुढी परंपरा जात–धर्मव्यवस्थेचा अभ्यास केला. जमीनदार वर्गाची श्रीमंती आणि दलितांच्या दारिद्र्याचाही त्यांनी आपल्या प्रवासात अनुभव घेतला. यातुनच त्यांनी आपल्या कार्याची दिशा ठरवली. समाजातील मागे पडलेल्या समुहाच्या

उत्थानासाठी, उत्कर्षासाठी आपले आयुष्य समर्पित करण्याचा निर्णय या ज्ञानी महापुरुषाने घेतला.

आपल्याला गौरवशाली भारत घडवायचा आहे. यासाठी निःस्वार्थी नेत्यांच्या आदेशांचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. सर्वसमावेशक शिक्षण हे एक माध्यम आहे. संपूर्ण समाज व्यवस्थेचा पायाच आता कोलमडू लागला आपल्यास सांगितला आहे व तो म्हणजे पराविद्या आणि अपराविद्या यांची सांगड हा होय. विज्ञान, गणित, भाषा या विषयांखेरीज आपल्याला चारित्र्य निर्माण या विषयावर आपले लक्ष केंद्रित करावे लागेल.

हे नवयुवका, राष्ट्र बघ तुला साहाय्यार्थ बोलवी
वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी...
तुझ्या जीवनी चैतन्यमयी पहाट येवो नवी
वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी...

भारताच्या भूमीत जन्मलेले एक अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे महापुरुष म्हणून स्वामी विवेकानंदाचे नाव आवर्जुन घ्यावे लागेल त्यांनी आपल्या अमोघ वत्कृत्वाद्वारे आणि विविध विषयांच्या सखोल अभ्यासाद्वारे साऱ्या जगाचे लक्ष वेधले.

आजच्या आधुनिक युगातही त्यांचे विचार श्रेष्ठतम ठरणारे आहेत. पृथ्वीच्या पाठीवर असा कोणता एक देश असेल की ज्याला, 'पुण्यभूमी' हे गोड आणि अन्वर्थक नाव द्यावे लागेल. असे एखादे स्थान असेल की, जिथे माणसात कोमलता, शुचिता, दया, दक्षिण्य, क्षमा, प्रकृती सद्‌गुणांचा इतर कुठल्याहीपेक्षा अधिक विकास झाला, अशी कोणती एखादी भूमी असेल जिला आंतरराष्ट्रीय आणि आध्यात्मिकतेचे माहेरघर म्हणता येईल, तर ती म्हणजे आपली ही मायभूमी भारतच होय. आपला भारत जगाला जगभरातील भ्रमंतीत अनुभवास आलेली काही ठाम सत्ये उपचार म्हणून साजरी न करता मुख्यतः त्यांची जीवनप्रणाली, त्यांचे विचार, कार्य यांचे पुनःपुन्हा स्मरण केले पाहिजे. तावून सुलाखून घेतलेल्या अनुभव विश्वाच्या बळावर स्वामींनी आपले विचार आत्मविश्वासपूर्वक मांडले.

विवेकानंदांचा जन्म १८६३ मधला केवळ ३९ वर्षांचे आयुष्य लाभलेले विवेकानंद समस्त मानवजातीसाठी होते. विज्ञानयुगाची सुरुवात होत असतानाच त्यांनी भविष्यकाळात होणारा धर्म आणि विज्ञान यातील संघर्ष अटळ आहे हे त्यांनी ओळखले होते म्हणूनच पर्यावरण, व्यक्त केलेली मते आजही गांभीर्याने विचार व्हावा अशी आहेत. विवेकानंदांनी पर्यावरणाचा आदर करा, मात्र मानवी आणि काळाच्या पुढे जाऊन असलेली विचारधारा, व्यक्त केली. यंत्रे हवीत पण यंत्रांनी मानवी सर्जनशीलतेला हद्दपार करता कामा नये हे त्यांचे म्हणणे आधुनिक वस्तुंची विपुलता येईल आणि त्यामुळे माणसे आत्मकेंद्रित होती हे त्यांनी वर्तविलेले भाकीत आज तंतोतंत खरे ठरताना दिसत आहे.

भारत देशाला राजकिय स्वातंत्र्य मिळून सहा दशके उलटली आहेत व आता शतकांकडे वाटचाल सुरु आहे. ब्रिटिशांच्या हातून सत्ता भारतीयांच्या हाती स्थिरावली आहे, परंतु हे खरे स्वातंत्र्य नसूल संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढा सुरु असणे आवश्यक आहे.

स्वामी विवेकानंद विक्रमी विश्वविजय संपादन करुन १८९७ साली भारतात परतल्यावर त्यांच्या पहिल्यावहिल्या भाषणास मद्रास (आत्ताचे चैन्नई) येथील, युवकांसाठी आवाहन केले होते. 'हे भारतातील युवकांनो, आता उठा ! जागे व्हा !! आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका. तेहतीस कोटी देव देवतांची बंदिस्त मंदिरात पूजा प्रार्थना करण्याऐवजी आपली शक्ती व वेळ या विराट अशा भारत मातेस अर्पण करा व या मातेच्या तेहतीस कोटी लेकरांची शिवभावे जीवसेवा' या भावनेतून सेवा करा. सुभाषचंद्र बोससारख्या अनेक नेत्यांनी केले व आपल्या प्राणांची मातृभूमीच्या वेदीवर आहुती दिली. या संग्रामात त्यांना आपली मातृभूमी सर्वश्रेष्ठ होती. दुदैवाने हे स्वातंत्र्य मिळताक्षणीच आम्हाला वाटले की आपले काम संपले व आपण तेथेच थांबलो आपण पूर्णपणे विसरुन गेलो की, स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने पूर्णत्वास जाण्यास या स्वातंत्र्याचा लढा वेगवेगळ्या सामाजिक स्तरावर चालूच असावा लागतो. देशसेवेच्या समिधा वाटत राहिल्याशिवाय यज्ञातील अग्नी प्रदिप्त असूच शकत नाही. तो विझुन जाईल व आपले तेच घडले.

आज आपण वेगवेगळे संप्रदाय, पंथ, धर्म यामध्ये विभागले गेलो. आपल्याभोवती अनेक विहिरी बांधून आपण या असंख्य विहिरीत राहू लागलो व बाहेरील जनसागराचा समाजाचा आपल्याला विसर पडला. सनातन अशा हिंदू धर्मात जो मानव धर्म अभिप्रेत आहे त्या विश्वधर्माची आपली पकड हळूहळू ढिली पडत गेली. सगळेच धर्म सत्य असून त्या वेगवेगळ्या मार्गांनी आणि अंतिम सत्याकडे म्हणजेच ईश्वराकडे पोहचू शकतो, या वेदांतील वचनाचे आपणास

विस्मरण घडले. आपण याचे आत्मचिंतन करुया आज आपल्यासमोर अनेक प्रश्न आवासून उभे आहेत. गरीब लोक उपासमारीने व कर्जाला कंटाळून आजही घरी सुखरूप परतेल याची शाश्वतीही कमी झाली आहे. अनेक युवक, युवती नैराश्येपोटी आत्महत्येस प्रवृत्त झाल्या  पिळवणूक, व्यभिचार, युवती-स्त्रियांवर होणारे अत्याचार बलात्कार आपण आपल्यास सोयर सुतक नसल्याप्रमाणे निष्क्रिय राहून किती वेळ सोसणार ? दिल्लीच्या प्रकरणाने आज सावधानतेची घंटा वाजली आहे.

तेव्हा 'पुढे चला, सतत पुढे चला' अगदी अखेरपर्यंत माणसांविषयी सहानुभूती बाळगा. हाच आपला मूलमंत्र असू दया. ईश्वरावर विश्वास असू दया. कोणत्याही कूटनीतीचे काही प्रयोजन नाही, कुटनीतीने, कपटाने चलाखीने काहीही साधत नसते. दुःखितांसाठी तुमचे हृदय कळवळू द्या आणि साहाय्यासाठी भगवंताची प्रार्थना करा. तुम्हाला साहाय्य मिळेलच. मी तुमच्यासाठी गरीब, अज्ञानी आणि दलित यांच्याविषयी सहानुभूतीचा आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्राणपणास लावून प्रयत्न करण्याचा वारसा ठेवून जात आहे. हे जे तीस कोटी भारतवासी दिवसेंदिवस खाली, खाली जात आहेत त्यांना वर आणण्यासाठी, त्यांचा उद्धार करण्यासाठी आपले सारे जीवन अर्पण करण्याची तुम्ही प्रतिज्ञा करा. तुम्ही खरोखरच जर माझे संतान असाल तर तुम्हाला कशाचीही भीती बाळगायला नको, कशानेही तुमच्या प्रगतीत बाधा यायला नको. तुम्ही सिंहासारखे व्हाल. आपण साऱ्या भारताला समस्त जगताला जागृत केले पाहिजे.

तरी न कधीही कोमेजावी मनातली पालवी,
वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी...

देही असावी बलसंपत्ती

आपण सुरुवात कुठून करणार याचे उत्तर आपल्याला विवेकानंदांनी तयार ठेवले आहे. आपल्याला गौरवशाली भारत घडवायचा आहे. यासाठी निःस्वार्थी नेत्यांच्या आदेशांचे पालन करणे आपल्या कर्तव्य आहे. सर्व समावेशक शिक्षण हे एक माध्यम आहे. संपूर्ण समाज व्यवस्थेचा पायाच आता कोलमडू लागला आहे. यावर एक महत्त्वाचा उपाय विवेकानंदांनी आपल्यास सांगितला आहे व तो म्हणजे पराविद्या आणि अपराविद्याची सांगड ही होय. विज्ञान, गणित, भाषा या विषयांखेरीज आपल्याला चारित्र्य निर्माण या विषयावर आपले लक्ष केंद्रित करावे लागले. दुर्दैवाने आपण हा विषय वर्गामध्ये पाठयपुस्तकातील धड्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्याचे काम करतो. याची सुरुवात खरी तर कुटुंबातील वडिलधाऱ्या मंडळींकडून व त्यांच्या कृतीतून झाली पाहिजे व पुढे ती शिक्षकांच्या उक्तीतून आणि वर्तनातून घडली पाहिजे. तरच आजचा युवक योग्य अर्थाने घडेल नष्पक्षा तो बिघडेल.

खऱ्या अर्थाने प्राचीन संस्कृती आणि वैभवशाली इतिहासाचे लेणे लाभलेले भाग्यवान आपण आहोत. पण आजची युवापिढी ही संगणक युगात जन्माला आलेली ज्ञान न देणे ही चूक आधीच्या पिढ्यांची आहे हे निश्चित ! उज्ज्वल भविष्याच्या निर्माणासाठी वर्तमानात भूतकाळांचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. बलवान राष्ट्राच्या उभारणीसाठी ते आवश्यक असते. आजची युवापिढी ही चंगळवादाच्या जाळ्यात अडकत चालली आहे. याला कारण, अस्मितेची विस्मृती झालेला समाज ! भय, भोग, भ्रम आणि भंपकपणाचा बाजार जोरात चालू आहे. बुध्द भेद करणारे विचारवंत विषाणूंप्रमाणे पसरत चालले आहे. देवदेश आणि धर्माबाबतची आस्था कमी होत चालली आहे, किंबहुना या गोष्टींना ठोकरणे म्हणजेच पुरोगामिता असा दुष्ट प्रचार चालू आहे. कोणत्याही मार्गाने धनवान बनावे असा एक कलमी कार्यक्रम दिसते त्यासाठी कोणताही विधिनिषेध पाळला जात नाही. श्रमापेक्षा दिखाव्याला प्रतिष्ठा आली. चारित्र्य राष्ट्रभक्ती, सेवा आणि त्याग या गोष्टी शब्दकोशापुरत्याच मर्यादित होताना दिसत आहेत. हे सर्व आपल्याला नेमके कोठे घेऊन जाणार असा प्रश्न पडतो.

स्वामीजी आपल्या उपदेशात म्हणतात, 'धैर्याने शौर्याने पुढे चला. एखाद्या दिवसात वा एखादया वर्षातच यश आपल्या पदरी पडेल अशी अपेक्षा बाळगू नका, मतस्त्र आणि स्वार्थपरायणता या दोन्ही गोष्टी टाळा. यांच्याविषयी सर्वदा प्रामाणिक राहा. म्हणजे अवघे जग हलवून सोडाल. लक्षात ठेवा की, स्वतःचे व्यक्तिमत्व, स्वतःचे जीवन हेच शक्तीचे रहस्य आहे. अन्य काही नाही.'

आजच्या पिढीवर हेच संस्कार हवेत. दुर्दैवाने संस्कारक्षम वयात शाळा महाविद्यालयात हे मिळत नाहीत असे वाटते. तथापि, शालेय पुस्तकातून जो जातीय द्वेषाचा खोटा इतिहास आजही शिकविला जातो त्याचे  काय ? स्फूर्ती मिळावी, पराक्रम गाजवावा असे वाटायला लावणारा कोणता भाग शिकवला अथवा सांगितला जातो. स्वतःच्या विचारांनी उत्तरेसुध्दा लिहू न शकणारी पिढी आपणच निर्माण करीत आहोत. मग, स्वतंत्र विचार करण्याचे बाळकडू कसे

मिळणार ? व्यायामाचे महत्त्व सांगण्याऐवजी स्नायूवर्धक, उंचीवर्धक आणि बलवर्धक औषधे खाऊ घालून बलवान, समाजाची निर्मिती होते काय?

स्वामीजींनी एका शिष्याला भगवद्गीता वाचण्यापेक्षा बाहेर जाऊन फुटबॉल खेळ असा सल्ला दिला होता, त्याची आठवण होते. याबाबत, स्वामीजी म्हणाले होते, 'बलवान व निरोगी शरीरात सशक्त मन नांदते. अशक्त शरीरात तसे होणे संभव नाही !' आजची पिढी फुटबॉल, हॉकी, क्रिकेट आदी खेळ खेळून दमते... फक्त हे खेळ ती संगणकावर खेळते आणि दमते, याला काय म्हणावे ? स्वामीजी म्हणतात, 'अनुकरण म्हणजे सभ्यता नव्हे भिऊन केलेल्या अनुकरणाने कधीच प्रगती होणार नाही.'

आपल्या पध्दतीने ग्रहण करुन आत्मसात करावी आपले स्वातंत्र्य गमावून आपण दुसऱ्याप्रमाणे होऊ नये. भारतीय जीवनपध्दतीच्या बाहेर जाऊ नका. अन्य समाजाप्रमाणेच सर्व भारतीयांनी पोषाख केला. अन्न घेतले व त्यांच्या चालीरिती उचलल्या म्हणजे कल्याण होईल, असा विचार क्षणभरही मनात आणू नका ? इंग्रजांनी जी शिक्षण व्यवस्था तयार करुन दिली तीच आपण आंधळेपणाने राबवीत आहोत. त्यामुळे त्या वेळच्या शिक्षणाबद्दल स्वामीजीचे विचार मांडतात ते आजही लागू असल्याचे दिसते ते सहजपणे सांगतात, ज्या शिक्षणामुळे सामान्य जनता जीवन संग्रामाला लायक होत नाही. ज्या शिक्षणामुळे चारित्र्यबल, परसेवा तत्परता आणि सिंहासारखे साहस निर्माण होत नाही त्याला शिक्षण म्हणायचे का ? ज्या शिक्षणामुळे माणुस आपल्या पायावर उभा राहू शकतो ते खरे शिक्षण होय.

उपनिषद काळात गुरु धर्मचर, सत्यवद, मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्य देवोभव, या गोष्टी आपल्या सोडून पैसे कसे मिळवावेत याचे शिक्षण शाळा कॉलेजातून दिले जाते. चारित्र्यशील नागरिक घडविणे व त्यादृष्टीने पावले राष्ट्र उत्थान. या विवेकानंदांच्या विचाराकडे आपण प्रवृत्त शोभायात्रा, मिरवणुका, मेळावे व भाषणे यापुरतेच मर्यादित राहून काहीच साध्य, होणार नाही तर या गोष्टींतून स्फुर्ती घेऊन विचारांच्या माध्यमातून आचारांच स्तरावर आपल्याला उतरावे लागेल व यातून मनुष्य निर्माणाची प्रक्रिया आपल्याला साधता येईल. यासाठीच स्वामीजी सांगतात, स्थिर बुध्दीचे व्हा सर्वात महत्त्वाचे म्हणजे पवित्र व्हा व श्रध्दा ठेवा... स्वतःच स्वतःचे भवितव्य घडवा. 'गतं न शोच्यम्' जे झाले ते होऊन गेले. त्याबद्दल खंत करीत बसू नका. म्हणतात ना की, 'वाहिले ते पाणी नि राहिली ती गंगा' अनंत भावीकाळ तुमच्या पुढे विस्तारलेला आहे आणि हे नेहमी लक्षात ठेवावयास हवे की तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार नि प्रत्येक कृत्य तुमच्या गंगाजळीत संचित राहिल आणि हे पण सदा लक्षात असू दया की, तुम्ही केलेले कुविचार आणि तुम्ही केलेली कुळमें ज्याप्रमाणे वाघासारखी तुमच्यावर झेप घेण्यास टपून आहेत, त्याचप्रमाणे ही देखील मोठ्या स्फूर्तीदायी आशेची गोष्ट आहे, की तुमचे सद्विचार आणि तुमची सत्कर्मे हजारो लाखो देवदुतांच्या शक्तीने तुमचे रक्षण करण्यास सदासर्वदा सज्ज आहेत.

'सामर्थ्य तुझ्या बाहुमधले तूच जगा दाखवी
वाट निरामय आयुष्याची शोधायला हवी...
तारुण्याला ही आव्हाने'

तेव्हा या समर्पक विचारांवर कृती होणे आवश्यक होते, पण स्वातंत्र्योत्तर काळात मागील पानावरुन पुढे चालू अशी गत झालेली आहे. आताची युवा पिढी हुशार आणि चौकस आहे. तिला योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे ते नसल्याने तिच्यासमोर जीवन उद्देशच नाही. सुराज्य निर्माण करणे हे ध्येय या पिढीच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. आजचे स्वराज्य हे क्रांतिवीरांनी सांडलेल्या रक्तावर उभे आहे हे त्यांना कळायला हवे.

तेव्हा या नवापिढीच्या युवकांसाठी शेवटी एवढेच सांगायचे आहे.

एकदा एखादी कल्पना स्वीकारली की मग तिलाच आपले जीवन सर्वस्व बनवा, सतत तिचाच ध्यास घ्या, स्नायू, तुमचे मज्जातंतू, तुमच्या शरीराचा अणुरेणू त्यांचं कल्पनेने भरला जाऊ द्या. इतर कोणत्याही विचारांना थारा देऊ नका. यशस्वी होण्याचा हाच मार्ग आहे.


– स्वामी विवेकानंद

संकलन : कु. अर्चना गायकवाड



# स्त्री जन्मां ही तुझी कहाणी





आजच्या स्त्रिया अवकाशात झेप घेत आहेत. पायलट झाल्यात, वेगवेगळ्या बँकांच्या, कंपनींच्या सीईओ पदी विराजमान झाल्यात, पंतप्रधान आहेत, राष्ट्रपती आहेत, पण स्त्री जन्माची ही कहाणी सुफळ संपन्न झाली आहे का ? सामान्य स्त्रीचं आयुष्य आजही चाकोरीबद्धच आहे. आपल्याकडच्या पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रिला तिच्या पायावर उभचं राहू दिलं नाहीये. आत्तापर्यंत तिला स्वतंत्र जगूच दिलं नाहीये.

हुंडाबळी विरोधी मोहिम, स्त्री शिक्षण, स्त्रीमुक्ती, स्त्रीस्वातंत्र्य एकीकडे अशा अनेक संघटना स्त्रियांसाठी काम करत असताना दुसरीकडे मात्र अजूनही घरामध्ये मुलींवर मुली जन्माला आल्यातर त्या त्यांच्या जन्मदात्या आईवडिलांनाच नकोशा असतात. गोठ्यात गाय किंवा शेळी जन्माला आली तर आनंद व्यक्त करतात. अंड्यातून कोंबडी बाहेर आली तर देव पावला म्हणतात. तरीपण नवपरिनेतेचा आशीर्वाद देताना मात्र 'अष्टपुत्र सौभाग्यवतीभव्'. आपण सगळेच म्हणतो ना ! काळ बदललाय, पण बदललेल्या काळामध्ये अष्ट पुत्राचं ईष्टपुत्र झालंय का ? सांगा ना ! तुझ्यापोटी एक छानशी गोंडस मुलगी जन्माला यावी असा आशीर्वाद का नाही दिला जात ?

आपल्याकडे मुलाला वंशाचा दिवा मानतात ना, तसंच मुलीला वंशाची पंती का नाही मानलं जात ? आपल्याकडे पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये लग्नानंतर मुलीचं नाव बदललं जातं. आडनाव सुध्दा तिला नवऱ्याचंच लावावं लागतं आणि म्हणूनच मुलगी कितीही हुशार असली तरीसुध्दा मुलाच्या तुलनेमध्ये कायमच तिला दुय्यम स्थानचं मिळतं. कारण वंशांचं नावं हे मुलगा पुढे चालवणार असतो. जोपर्यंत लग्नामध्ये मुलीला हुंडा दयावा लागतोय. जोपर्यंत स्वतःच्या आईवडिलांच नाव पुढे चालवण्याची संधी समाज मुलीला देणार नाही तरीही स्त्रीमुक्तीसाठी आपण कितीही आक्रोश केला ना, तरीही तो फक्त कानांपर्यंत पोहोचेल मनाला जाऊन भिडणार नाही.

पूर्वी सती परंपरा होती त्यामध्ये नवऱ्याच्या मृत्युनंतर स्त्रीचा जगण्याचा अधिकार हिरावून घेतला जायचा. पण आज त्याहीपेक्षा भीषण परिस्थिती हो. स्त्रीभ्रूणहत्या म्हणजे मुलीच्या जन्माच्या आधीच तिच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेतला जातोय. त्यावर कितीही कायदेशीर उपाययोजना केल्या तरीपण जोपर्यंत आपण बदलत नाहीत तोपर्यंत समाजाची मानसिकता बदलणं शक्य होणार नाही.

हृदयी अमृत नयनी पाणी ।  
स्त्री जन्मां ही तुझी कहाणी ।।  
अश्रू का ढाळशी ग उगी ।।  
त्याने आबलता तुझी सिध्द होई जगी ।।  
चालसी आता पुरुषांच्या खांदयाला खांदा लावुनी ।  
जरा वाढता पुरुषी आवाज डोळे  
का येती ग भरुनी ।।  
नको आणूस गं डोळ्यात पाणी असे ।  
तुझ्या सबलतेचे नको करुन घेऊन हसे ।।  
तुझी सबलता राखायला येती अडचणी बहु ।  
म्हणूनी तू गं अशी रडत नको राहू ।।  
नको भिऊस गं या पुरुषी आवाजाला ।।  
सबलता तुझी दाखवून दे जगाला ।  
पुसूनी टाक ते नयनाचे पाणी ।  
बदलुनी दाखव तुझी ही कहाणी ।।

- कु. संध्या मनोज कराळे  
(एफ.वाय., बी.ए.)



# भेदभावाचा राक्षस

स्वत:ला दुसऱ्यांपेक्षा वेगळं समजणं हा एक भ्रम आहे. आणि स्त्रियांना कमजोर समजणं हा भ्रम तर अत्यंत मागासलेपणाचं लक्षण आहे.

भारतीय महिलांच्या बाबतीत अनेक चढउतार येत राहीले आहेत. जिथे प्राचीन काळापासून स्त्री-पुरुषांना समान दर्जा होता, तेथे मध्य काळामध्ये स्त्रियांची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय झाली. त्यानंतर अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांना बरोबरीचा दर्जा मिळावा, यासाठी भरभक्कम प्रयत्न केले. खरंतर भारताच्या संविधानानुसार स्त्री - पुरुषांना समान अधिकार मिळायला हवा. परंतु, वास्तविकता अशी आहे कि, लिंगभेदाच्या आधारावर आज मोठ्या प्रमाणावर असमानता आहे. महिलांच्या बाबतीत हिंसा या लिंगभेदाचे आधारावर आज मोठ्या प्रमाणावर असमानता आहे. महिलांच्या बाबतीत हिंसा या लिंगभेदाचा प्रखर रुप आहे आणि ते खूप व्यापक आहे. इंडिया टुडे १६ जून २०१९ च्या अंकात थॉमसन राइटस् फाऊंडेशनने केलेल्या एका विश्वव्यापी सर्वेक्षणात असं आढळून आलं कि, 'भारत हा जगामध्ये महिलांसाठी चौथ्या नंबरचा भयानक देश' आहे. आणि जी-२० देशात महिलांसाठी भयानक अशी जागा आहे. या सर्वेक्षणामध्ये जगातील तज्ज्ञांना आरोग्याच्या समस्या, लैंगिक छळ, रुढी परंपरा व धर्माशी जोडलेल्या अनैतिक प्रथा, आर्थिक संसाधनांपर्यंत न पोहोचणे आणि देह व्यापार अशा या सहा मापदंडांच्या आधारे महिलांसमोरील संकटांच्या आधारे देशांचा क्रम लावण्यास सांगितले गेले होते. याचे जे परिणाम आले ते पाहता, आपल्या देशाच्या प्रगतीच्या आपण कितीही गर्वाने चर्चा करीत असलो तरी जे चित्र आहे ते अत्यंत विचलित करणारं आहे. कारण आजही आपली अर्धी लोकसंख्या जगण्याच्या मौलिक आणि मुलभूत अधिकाराला मुकलेली आहे.

या सर्वेक्षणात हे सत्यही समोर आलं की, शिक्षण आणि आरोग्य सेवा सर्वांपर्यंत पोहोचतच नाहीत. ही गोष्य बातम्यांमध्ये कायम स्थान मिळविणाऱ्या बलात्कार किंवा हत्या यांच्यापेक्षा गंभीर नसली तरी त्यापेक्षा कमी गंभीरही नाही. महिलांसाठी धोकादायक मानल्या गेलेल्या पाच देशांमधील महिलांना जाणुनबुजून मुलभुत मानवाधिकारांपासून लांब ठेवलं जातं. या देशात अजूनही त्यांच्या स्वत:च्या जीवनाविषयीच्या गोष्टींवरही त्यांची मर्जी चालत नाही. आर्थिक व्यवहार, जमिनजुमला, वारसाहक्क, शिक्षण, रोजगार, न्याय-अन्याय आणि पोषण हे मुद्दे तर त्यांच्यापासून कितीतरी लांबच आहेत.

या विषयी मी अनेक तज्ज्ञांशी चर्चा केली. त्यातून दोन प्रमुख कारणं समोर आली. पहिलं कारण म्हणजे भारतामध्ये मुलींना मुलांपेक्षा कमी लेखलं जातं. मूल्यांकनाच्या या विकृत कृतीचे परिणाम म्हणून समाजात अनेक तऱ्हेची विषमता तयार झालेली आहे. मुलगा किंवा मुलगी या पैकी मनासारखं अपत्य प्राप्त न झाल्या अंदाधुंद गर्भपात, एवढेच नाही तर आरोग्य सेवा आणि शिक्षण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात भेदभाव आहेत.

मिलीभगत संस्कृती वाढणं ही दुसरी समस्या आहे. जे लोक महिलांचा छळ करताता, एक तर ते करत असलेला छळ समोर येतच नाही आणि त्यांना कायद्याने शिक्षाही होत नाही. अशा असंख्य घटना आहेत ज्यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांच्या बलात्काराला बळी पडलेल्या महिलेला तोंड ठेवण्यासाठी आणि कोर्टातील चक्रापासून वाचविण्यासाठी बलात्कारी पुरुषाबरोबरच विवाह करण्यासाठी दबाव टाकला गेला. निर्णय आणि आरोग्य सेवा सर्वांपर्यत पोहोचत नाहीत. ही गोष्ट, बातम्यांमध्ये कायम स्थान मिळविणाऱ्या बलात्कार किंवा हत्या यांच्यापेक्षा गंभीर नसली तरी त्यापेक्षा कमी गंभीरही नाही. परंतु डिसेंबर २०१२ मधील निर्भया बलात्कार प्रकरणानंतर मोठ्या प्रमाणात उसळलेल्या लोकांच्या संतापावरुन समजतं, की यात बदल होणं शक्य आहे. यामुळे महिलांसाठी खूप गोष्टी बदलतील. फक्त कायदे असणं पुरेसं नाही. कायदा लागु करण्यासाठी परिणामकारक व्यवस्था असावी लागते, तरचं कायदा प्रभावी ठरतो. आणि आता तसं होऊ शकेल, या गोष्टीचे संकेत मिळत आहे.


नव्वदाव्या दशकाच्या सुरुवातीपासून भारतात सुरु

झालेल्या आर्थिक उदारीकरणामुळे गेल्या पाच वर्षात राष्ट्राच्या विकासाच्या आकडेवारीत वृद्धी झालेली दिसत नाही. चीन, जपाननंतर भारत ही अशियातील तीसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून सर्वांसमोर येत आहे. संघटित क्षेत्राचा झपाट्याने होत असणारा विकास आणि मुलींसाठी उच्च शिक्षणाच्या उपलब्धतेचा परिणाम म्हणून आता पहिलापेक्षा कितीतरी जास्त महिला व्यावसायीक पदांपर्यंत पोहोचल्या आहेत. आजही अनेक घरांमध्ये लग्न झालेल्या परंतु व्यावसायीक यश मिळविणाऱ्या स्त्रीयांकडूनही मुलांची देखभाल, स्वयंपाक करणं, साफसफाई करणं अशा कामांचीसुध्दा अपेक्षा ठेवली जाते. अनेकदा त्यांच्या परिवारातले लोक तिच्या व्यावसायिक कामाला करिअरचा एक भाग न समजता फक्त पैसे कमवण्याचा एक मार्ग समजतात. अशा पध्दतीच्या दबावांमुळेच अशी एक विचारधारा बनली आहे की, काम करणाऱ्या स्त्रीयांचं आपल्या संसारात, घरात तेवढसं लक्ष नसतं आणि मग अनेकदा घरच्यांच्या दबावामुळे तीला आपल्या कामांशी तडजोड करावी लागते.

महिलांच्या बाबतीतील हिंसा या लिंगभेदाचे प्रखर रुप आहे आणि ते खूप व्यापक आहे. मला वाटतं, की समाजच त्यांच्या करिअरच्या मार्गात अडथळे निर्माण करतो. त्याचा सामना करण्यासाठी कामाच्या पध्दतीमध्ये विविधता आणणं आवश्यक आहे. सक्षम महिलांना समाजाने तयार केलेल्या अडचणींना सामोरं जाण्यासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकता आहे.

हीच वेळ आहे कि, आपण दृढतेने अशी पावलं उचलूया ज्यामुळे स्त्री आणि पुरुष खऱ्याअर्थी समान स्थानांवर येतील. गेल्या दशकात कमीत कमी अर्धाडझन वेळा महिला आरक्षण बील लोकसभेत दाखल केलं गेलं. तरंतु अजूनही त्याला कायद्याचे स्वरुप प्राप्त झालेलं नाही. अनेक राजकीय पक्षात महिलांचं प्रतिनिधीत्व वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांनंतरही महिलांची संख्या जितकी हवी त्यापेक्षा अजूनही बरीच कमी आहे. वैयक्तिक पातळीवर माझी इच्छा आहे की, संसदेसह सर्व वैधानिक भागात महिलांसाठीही ३३ % आरक्षण असायला हवं. यामुळे देशातील पुढच्या पिढीतील तरुण महिलांमध्ये जास्ता आत्मविश्वास निर्माण होईल. महिलांमध्ये अनेक प्रकारचे टॅलेंट आहे ज्याचा उपयोग देशाच्या निर्माणासाठी, विकासाच्या प्रक्रियेसाठी योग्य उपयोग केला जाऊ शकेल. याची गुरुकिल्ली शिक्षण आहे. शिक्षण फक्त महिलांनाच नाही , तर ते स्वत:ला महिलांपेक्षा उच्च मानतात त्यांच्यासाठीसुध्दा आवश्यक आहे.

'स्त्रीचा उदय'
उद्योन्मुख स्त्री,
तिची मान आहे ताठ
तर नजर आहे सरळ
तिला स्वत:ची मूल्ये आहेत.
ती निर्भय आहे, ती उदात्त आहे.
सुसंस्कृत, अढळ, अज्ञानाला दूर सारणारी
जीवनातील आनंदाचं स्वागत करणारी,
शिकण्यासाठी तत्पर असणारी
अशी आहे संपूर्ण स्त्री आणि असा आहे तिचा धर्म.




काम असेल कठीण, नसतं कधी अशक्य
पूर्णविराम नंतर तर, संपत ते पूर्ण वाक्य,
नशीबाला शिव्या देत
प्रयत्नांना मुकरु नको काटेरी मार्ग असेल
पण ध्येय कधी सोडू नको ।

जागोजागी मिळतील वैरी, नको त्याची भ्रांत
लक्ष्य ध्यानात ठेव, तू चाल रे निवांत, शत्रुंना घाबरत
मान कुठेही झुकवू नको
काटेरी मार्ग असेल, पण ध्येय कधी सोडू नको ।।

जन्मला आहे तर जग, नको पाहू मागे
आयुष्याचा शेवटी बाकी फक्त आठवणींचे धागे
माणूस म्हणून जगला
पण सामान्य माणूस म्हणून मरु नको
काटेरी मार्ग असेल, पण ध्येय कधी सोडू नको ।।

गौरी विजय पंडित (एफ.वाय.बी.ए.)

# सोशल मीडियाचा वाढता प्रभाव...



आपल्या संस्कृतीमध्ये होणाऱ्या नवीन परिवर्तनांमुळे आपण नवनवीन आव्हानांना सामोरे जात आलो आहोत आणि या प्रक्रियेतच मानवाचा विकास होतो. सोशल मिडिया हे माहितीचं एक महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून आपल्या समोर आलं आहे. आणि सोशल मीडियाने जनतेच्या विचारांना प्रसारित करुन लोकांमध्ये खासकरुन तरुणांमध्ये राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांविषयी प्रोत्साहित करण्याच्या नवीन पध्दतीला जन्म दिला आहे. एक राजकिय उपक्रम म्हणून सर्वांमध्ये सोशल नेटवर्कींग विषयी आनंदाचे भाव आहेत. खासकरुन शहरामध्ये मोबाईल फोन वापरणाऱ्यांची संख्या वाढल्यानं ऑन लाईन राहणाऱ्यांचे प्रमाण अपेक्षेपेक्षा जास्त वाढलं आहे. जसजसे मध्यवर्गीय वाढत जातील तसतशी भारतातील इंटनेट वापणाऱ्यांची संख्याही वाढत जाईल अशी अपेक्षा आहे. भारतात फेसबुकचा वापर करणारे जवळपास ८० कोटी लोक राजकारणापासून स्वतःला लांब ठेवू शकत नाहीत. सर्वांमध्येच ही भावना आहे कि, समाजाच्या अत्यंत वेगानं वाढणाऱ्या नवीन सवयी जीवनशैलीशी सामावून घ्यायला हवं. हा वर्ग सोशल मीडियावर अत्यंत सक्रिय आहे. त्यामुळे अतिउत्साहाच्या भरात सोशल मीडियामध्ये असणाऱ्या सुप्त संभावना आणि त्यांची भूमिका या गोष्टींना मीडियामध्ये अतिशयोक्ती करुन प्रस्तुत केलं जातं.

जर २०१३ हे वर्ष पाहिलं तर हे इंटरनेटचं वर्ष होतं. इंटरनेटच्या वापर करणाऱ्यांची आकडेवारीच सांगते कि, भारतीय समाजात इंटरनेटचा वापर अत्यंत वेगानं वाढत आहे. आज इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या २१३ कोटी पर्यंत पोहोचली आहे. म्हणजे २०१२ मधे १५ कोटी लोक इंटरनेट वापरायचे, त्यामध्ये ४२ टक्यांनी वाढ झाली आहे. इंटरनेट वापरणाऱ्यांमध्ये मोबाईल फोनवर इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ही जवळपास १३ कोटी आहे. २०१४ च्या निवडणुकीपूर्वी मी अंदाज लावला होता कि, भारतातील ५४३ संसदीय निवडणुक क्षेत्रांपैकी १६० निवडणूक क्षेत्रावर फेसबुकचा उपयोग करणाऱ्यांचा महत्त्वपूर्ण प्रभाव राहील.

या निवडणुकीचे निकाल लागताच ही गोष्ट सिध्द झाली. मी समजतो की, या निवडणुकीतील ३० ते ४० जागांवर सोशल मीडियाचा प्रभाव नक्की होता. पुढील निवडणुकांमध्ये हा आकडा वाढून ६० टक्यांपर्यंत जाऊ शकतो. अनेक निवडणुक क्षेत्रातील प्रचारांमध्ये, नेहमीचा प्रचार आणि जाहिरात परंपरेला मागे टाकत सोशल मीडियाचे स्थान हे पहिल्या तीन मध्ये होतं.

हा नवनिर्मितीचा काळ आहे. ही सोशल मीडियावर उठलेली लाट भारतीय तरुणांच्या मनात जाऊन पोहोचली. देशातील प्रत्येक गावातील, शहरातील तरुणांच्या मनात देशाला विकसित करण्याचे तरंग, नरेंद्र मोदीजींनी तयार केले. नरेंद्र मोदी जेव्हा पंतप्रधानपदाची शपथ घेत होते तेव्हा त्यांच्या फेसबुक अकाऊंटवर जवळपास १.६ कोटी लोकांचे 'लाईक' आले होते आणि या संख्येनुसार जगातील तमाम पसंत केलेल्या राजकारणातील नेत्यांमध्ये त्यांचे स्थान हे दुसरे होते आणि ट्विटरवर त्यांना फॉलो करणाऱ्या जगभरातील नेत्यांच्या सूचीमध्ये त्यांचा क्रमांक सहावा आहे.

परस्परांशी जोडलेले नियम

१. संक्रमणाचा नियम : आपल्या संपर्कात असणाऱ्या लोकांचा आपल्या जीवनावर प्रभाव पडतो.

२. अनुकरणाचा नियम : आपण आपल्या मित्रांचे अनुकरण करतो.

३. प्रतिसादाचा नियम : आपल्या मित्रांच्या मित्रांचा आणि अगदी त्यांच्या मित्रांचाही प्रभाव पडतो.

४. अस्थिरतेचा नियम : कोणत्याही नेटवर्कचे एक आयुष्य असते.

आपण जितक्या जास्त लोकांच्या संपर्कात असतो त्या सर्वांचा आपल्या जीवनावर परिणाम होत असतो. आपला हा संपर्क आपल्या जीवनातील अशा आकांक्षा, भावना आणि आपल्या आरोग्यावर प्रभाव करत असतो. आपल्यात आपल्या मित्रांची, जवळच्यांची नक्कल करण्याची प्रवृत्ती असते. मित्रांकडून आपल्याला 'स्विकृती ' आणि 'सुरक्षा' मिळते. आपला एखादा मित्र नवीन गोष्ट खरेदी करतो, नवीन ठिकाणी

जातो किंवा नवीन काही करतो. त्याने केले म्हणून आपणही ते काम करतो. ती गोष्ट खरेदी करतो किंवा त्याच स्थानावर जातो, जिथे आपले मित्र गेले होते. आपल्या मित्रांमुळेच प्रभावित होत नाही तर आपल्या मित्रांचे मित्र आणि त्यांच्या मित्रांचाही आपल्यावर प्रभाव पडतो. याचा अर्थ आपण जे काही करतो त्यांचे प्रतिध्वनी यातील उर्जा संपायच्या अगोदर आपल्या मित्रांच्या तीन स्तरापर्यंत जाऊन पोहोचतात. प्रत्येक नेटवर्कचा स्वत:चा एक जीवनकाळ असतो. कुठल्याही नेटवर्कला कुठलीही एक व्यक्ती नियंत्रित करु शकत नाही. नेटवर्क हे अत्यंत गुंतागुंतीचे गतिमान आणि सारखे बदलणारे असते. नेटवर्कसाठी कुठलाही केंद्रीय नियंत्रण बिंदू नसतो. परंतु हे सूचनेच्या सहभागावर काम करते. एक उदाहरण म्हणून विकीपिडीयाचे उदाहरण घेऊ. विकीपिडीया एक खुली सूचना व्यवस्था आहे, त्यावर उपलब्ध माहितीचा लाभ कोणीही घेऊ शकतं. सर्वात जास्त मजेदार गोष्ट कुठली असेल तर याचं कुठलंही केंद्रीकृत नियंत्रण नाही. तसेच अनेक स्वनियोजित समूहांना जसे अनौपचारिक अधिकार असतात तसे अधिकारी इथे कोणाकडेच नाहीत. विकीपिडीया ही अशी प्रणाली आहे. ज्यात ज्याच्या माहितीत कुणीही बदल करु शकतो. याचा उपयोग होऊ नये म्हणून स्वनियंत्रण आणि एकमेकांचा एकमेकांवर असलेला दबाव या उपयोगी ठरतात.


सोशल मीडिया हा भारतीय राजकारणातील आमूलाग्र बदल करणारा घटक ठरला आहे. राजकार्ण्यांना देखील ऑनलाईन माध्यमातील या लपलेल्या संभावना समजायला लागल्या आहेत, की त्यांचे संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याची गती वाढवणारे ये तंत्र आहे. अमेरिकासारक्या देशातही निवडणूक प्रचारामध्ये याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते आणि तीच स्थिती आता भारतात देखील तयार होत चालली आहे. सोशल मिडीया एक दुधारी तलवार आहे. कारण जर समाजात तुमच्याविषयी एक चुकीचा संदेश जरी गेला तरी तो तुम्हाला बाहेर काढू शकतो आणि हे व्हायला वेळ लागत नाही.

राजकारण्यांना देखील
ऑनलाईन
माध्यमातील, या
लपलेल्या संभावना
समजायला लागल्या
आहेत, की त्यांचे
संदेश लोकांपर्यंत
पोहचविण्याची गती
वाढवणारे हे तंत्र आहे.

जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्राचे भविष्य हे जनतेच्या हातात आले आहे. लोक देखील इतके सक्षम झाले आहेत जेवढे यापूर्वी कधीच नव्हते. देशातील नेत्यांवर मग ते सरकारी अधिकारी असतील, किंवा विधी मंडळातील लोकप्रतिनिधी असतील, लोकांना त्यांच्यावर दबाव कसा टाकायचा याची पध्दत कळाली आहे. सरळ आहे. सोशल मिडियामुळेच त्यांना हे लक्षात आलं, की त्यांच्या आवाजात दम आहे. आपले विचार, आपलं बोलणं लोकतांत्रिक स्वरुपात सगळ्यांसमोर ठेवलं गेलं, तर आपण सर्वजण एका उद्देशासाठी एका मंचावर संघटित होऊ शकतो, आंदोलन करु शकतो आणि बदलाची ठिणगी पेटवू शकतो.

– राहुल मोहन शिंदे (एफ. वाय. बी. ए.)

# प्रेम-मैत्री



प्रेम हा चर्चेचा विषय नसतो,
तो मैत्रीमुळेच घडून येत असतो.
मैत्री शिवाय प्रेम घडत नसते,
प्रेमा शिवाय मैत्री टिकत नसते.
मैत्रीमुळे घडलेले प्रेम गुन्हा नव्हे,
प्रेमामुळे वाढलेली मैत्री अपराध नव्हे.
जे जगतात ते प्रेम करतात,
जे जगतात ते मैत्री करतात,
जे जळतात ते भानगड म्हणतात.
जे जळतात ते नाटकही म्हणू शकतात.
प्रेमा शिवाय पर्याय नसतो
मैत्री शिवाय थारा नसतो.

# जीवनातील स्थान...



लहान असल्यापासून आई आपल्या मुलांना सांगत असते इथे जाऊ नका बाबा मारेल, तिथे जाऊ नको बाबा मारेल, झाडावर चढू नको बाबा मारेल, नदीवर जाऊ नको बाबा मारेल, शाळेत जा नाहीतर बाबा मारेल,हे नको करु बाबा मारेल, ते नको करु बाबा मारेल. मग मुलं सुध्दा बाबांना घाबरतात. बाबांच्या भयाने शाळेत जातात. बाबाने मारु नये म्हणुन अभ्यास करतात. बाबांच्या दहशतीखाली शिकत राहतात. हळूहळू मुलं बाबांकडे दूर्लक्ष करुन आईवरच प्रेम करु लागतात. मनामधून बाबांना काढून टाकतात. आईच्या चरणांवरती सर्वस्व अर्पण करतात. बाबांपासून चार हात दूरच राहतात.

मुलं आईचं गाणं गातात. कोणतंही मुलं बाबांना दुधावरची साय म्हणत नाही. लंगड्याचा पाय म्हणत नाही. वासराची गाय म्हणत नाही. बाबांसाठी मुलांकडे शब्दच नसतात. मुलाचा पायाला ठेच लागली तरीही मुलं बापरे म्हणत नाही आणि साने गुरुजींना ही श्यामचा बाप दिसत नाही. आई घरी असली की घर कसं भरल्यासारखं वाटतं, बाबा घरात नसले की मात्र स्मशानशांतता.

मुलं शपथ सुध्दा आईचीच घेतात. बाबा शपथेच्याही लायकीचा नसतो. बाबा असतो केवळ मुलांच्या नावाच्या आणि आडनावांच्या मध्ये नावापुरता. मुलं विठोबाला माऊली म्हणतात. धरणीला माय म्हणतात आणि देशाला माता म्हणतात. बाबा मात्र धरणीतून, देशातून आणि मुलांच्या मनातून केव्हाच झालेला असतो हद्दपार. बाबा असतो कठोर, काळीज नसलेला, मारकूटा, बाबा असतो मुलांच्या स्वप्नात बागुलबुवा. बाबा म्हणजे केवळ पैसे, रुपये कमवण्याचे यंत्र. तेवढं काम त्यानं केलं की त्याचं कर्तव्य संपलं. पण मग असं असुनही बाबा मेल्यावर मुलांच्या मनात धडकी का भरते ? का ओघळतो मुलांच्या डोळ्यातून पाऊस ? का वाटतं मुलांना पायाखालची जमीन सरकल्यागत ? का वाटतं मुलांना कि, आपण बेसहारा झालोय? का हंबरतात मुलं बाबा गेल्यावर ? कविता, कादंबरी यात कधीही नसलेला हा पत्थरदिल बाबा प्रत्यक्षात जेव्हा नसलेला होतो का वाटतं मुलांन की, डोळे मिटून जी प्रेम करते तिला प्रियसी म्हणतात, डोळे उघडे ठेवून जी करतात त्याला मैत्री म्हणतात, डोळे वटारुन जी प्रेम करते तिला पत्नी म्हणतात, स्वत:चे डोळे मिटेपर्यंत जी प्रेम करते तिला आई म्हणतात. पण डोळ्यांत प्रेम न दाखवता जो प्रेम करतो त्याला बाबा म्हणतात.

आपल्या जीवनात वडिलांचे स्थान हे काहीच नसते. आपण सर्व कष्ट हे आईमुळेच करत असतो. पण त्याच्यात वडिलही आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे हे आपण विसरुन जातो. जर शिवाजी महाराज जिजाऊंमुळे घडले असतील तरी त्यापाठीमागे शहाजी महाराजांची धडपड होतीच की हे लक्षात घ्यावे. रामांची आई कौसल्या होती पण पुत्रयोगाने तडफडून मरणारा दशरथ हा एक बापंच होतो. या जगात बापाला आपण आपल्या आयुष्यात काहीच स्थान देत नाही.

आईने जरी आपल्याला जन्म दिला असेल तर त्याचे पालनपोषण हा बापंच करतो. आपल्यासाठी रात्रीचा दिवस करतो. त्याला त्याच्या दु:खाचे काहीच वाटत नाही. कारण त्याला माहित असतं अजुन आपल्या मुलाचं शिक्षण, मुलीचे लग्न बाकी आहे. ही आशा ठेवून तो जगत असतो. आपल्या स्वत:साठी तो एक रुपया ही खर्च करत नाही मात्र दुसऱ्यासाठी मागेपुढं न पाहता खर्च करतो. कितीही संकटे आली तरी तो डगमगत नाही. काहीही झालं तरी रडत नाही पण रात्री झोपतांना उशीत तोंड खुपसून रडतो तो आपला बापंच असतो.

मुलगी जेव्हा सासरी जायची असते तेव्हा मात्र डोळे भरुन रडतो. कारण मुलीला आपल्या वडिलांची प्रत्येक इच्छा कळत असते. मुलगी ही वडिलांचे सर्वस्व झाललं असते. अगदी आई तर कधी आजी तर कधी मुलगी हे सर्व आठवून तो रडत असतो. सकाळी उठल्यावर कोणी विचारलं की पैसा खर्च केल्याचं दु:ख वाटते की नाही ? तर तो नाही म्हणतो कारण त्याचे उत्तर असते की माझी मुलगी सुखी झाली मग मला पैसा खर्च झाल्याचे काहीही वाटत नाही. असा असतो बाप. झाला तर काटेरी फुल...नाहीतर असतो अगदी कापसासारखा मऊ अगदी हळवा.

।। बाबा तुम्ही ग्रेट आहात
सर्वांना समजावून घेणारे एक वडिल आहात
मुलीच्या पाठीवर हात थोपटवणारे पिता आहात
आई नसली की, मुलांना सांभाळणारे
तुम्ही एक आधार आहात...।।

**- कांचन अशोक वारुळे (एफ.वाय.बी.ए.)**

# अहिल्याबाई होळकर
## आदर्श एका सामाजिक कार्याचा





अहिल्याबाई होळकर यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यांनी महेश्वराला आपल्या राज्याची, राजधानी बनविले व वेगवेगळ्या प्रदेशातील विद्वानांना कायस्वरुपी जहागिऱ्या प्रधान केल्या. त्यामुळे हे विद्वान आपल्या उदरनिर्वाहासाठी इकडे तिकडे न भटकता महेश्वर मध्ये स्थायीक झाले व शिक्षणाकडे लक्ष देऊ लागले. अहिल्याबाई होळकर यांनी तेलंगणा, गुजरात, संगमनेर तसेच नर्मदेच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या वेगवेगळ्या विषयांच्या विद्वानांना महेश्वर मध्ये संरक्षण दिले. ते सर्व वेगवेगळ्या विषयात निष्णात होते. त्यामध्ये मल्हार भट्ट जाणीबा, पुराणिक, रामचंद्र रानडे, काशीनाथ शास्त्री, दामोदर शास्त्री, निहिल भट्ट अशा प्रकारच्या अनेक विद्वानांना त्यांनी आपल्या राजधानीत ठेवले होते व आपल्या जनतेची काळजी त्यांनी घेतली होती.

आपले राज्य समृध्द व्हायचे असेल तर प्रजेसाठी शिक्षण व आरोग्य हे घटक खूप महत्त्वाचे असतात. म्हणूनच अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यामध्ये दवाखान्याची निर्मिती केली होती. त्यांनी आयुर्वेद शास्त्रातील औषधी वनस्पतींच्या बागा लावल्या होत्या. एवढेच नव्हे तर मानवी आरोग्य निरोगी रहावे यासाठी शासकीय सुविधा देखील निर्माण केल्या होत्या तसेच दवाखान्यासाठी लागणारे निष्णात वैद्य देखील उपलब्ध केले होते.

अहिल्याबाई होळकर यांनी केवळ आपल्या राज्यातील जनतेसाठीच सामाजिक केले असे नाही तर त्यांनी आपल्या राज्यातील पशु-पक्षांवरही प्रेम केले. त्यांनी गायींसाठी कुरणे राखून ठेवली होती. सुगीच्या दिवसात त्या अंतरावअंतरावर पिकांच्या शेतीचा एक वाटा पाखरांसाठी राखून ठेवत. याचप्रमाणे मोकाट हिंडणाऱ्या जनावरांची देखील काळजी घेत असत. पक्षांसाठी धान्याने पिकलेल्या उभे पिक त्या विकत घ्यायच्या आणि ह्या पक्षांसाठी खुली ठेवत होत्या. तसेच पक्षांना आणि प्राण्यांना पाणी पिण्यासाठी त्यांनी गावोगावी हौदांची निर्मिती केली होती.

अहिल्याबाई होळकर यांचे पर्यावरण विषयक दृष्टीकोन देखील खूप मोलाचे आहे. त्यांनी रस्त्याच्या दूतर्फा, ओसाड व पडिक डोंगरावर लिंब, आंबा, चिंच, पिंपळ, वड, औदुंबर यांची भरपूर झाडे लावलेली होती. या झाडांची मुळे खोलवर तसेच दूरवर जाऊन जमिनीत नैसर्गिक गारवा टिकून रहात असे व पाऊसही मोठ्या प्रमाणावर पडत असे. त्यांनी असाही नियम केला होता कि, प्रत्येक शेतकऱ्याने वीस झाडे लावलीच पाहिजे. त्यातील अकरा झाडे सरकारची तर ९ झाडे शेतकऱ्याची होती. तसेच नदीचे पाणी खराब होऊ नये यासाठी मूळ प्रवाहापासून एक प्रवाह बाजूस वळवून त्याचा उपयोग स्नान, कपडे धुणे, जनावरांना पाणी आदी कामांसाठी केला जात असे. एवढेच नव्हे तर त्यांनी वनीकरण, जलसंवर्धन, जलीकरण यास्तव स्वतंत्र खाते निर्माण केले होते. एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची हत्या करणे असा विचार त्यांचा होता. अशा प्रकारचे उदात्त कार्य त्याने पर्यावरणाचा योग्य समतोल राखण्यासाठी केले.

- गौरी विजय पंडित (एफ.वाय.बी.ए.)

# संत तुकाराम महाराजांचे समाज प्रबोधन



संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
तुका झालेसी कळस । भजन करा सावकाश ।।
भागवत धर्माच्या मंदीराचा कळस म्हणून ज्यांची ख्याती आहे त्या तुकाराम महाराजांच्या चरणी साष्टांग वंदन करुन त्यांनी विठ्ठलभक्ती बरोबरच समाज प्रबोधन केले त्याचा हा आढावा.

तुकाराम महाराजांचा या देहातील कालखंड इसवी सन १६०८ पासनू १६५० पर्यंत होता. म्हणजेच सुमारे चारशे वर्षांपुर्वीचा हा कालखंड आहे. तुकाराम महाराजांनी प्रपंचातील अतोनात दु:खाना कंटाळुन विठ्ठल उपासनेला प्रारंभ केला. कठोर तपसाधना करुन आत्मज्ञान प्राप्त केले. याच कालखंडामध्ये परकीय आक्रमणामुळे संपूर्ण समाज मनाने तसेच व्यावहारीक दृष्ट्या अस्वस्थ झाला होता. कर्मठ,कर्मकांड, कमालीचा नास्तिकणा, वाह्यात तर्कटीपणा व बुवाबाजी असा हा अचारभ्रष्ट व विचारभ्रष्ट समाज आत्मघातकी झाला होता. समाजाची अशी दिन अवस्था पाहून तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीतुन समाजाला एक नवी, समृध्द व आत्मोन्नत करणारी दिशा व प्रांजल शब्दातुन समाजापुढे ठेवले. ते तत्त्वज्ञान स्वत: प्रत्यक्ष आचरणात आणून ती विचारधारा पुढे वारकऱ्यांमध्ये आत्मसात करवून मोठा वारकरी – संप्रदाय निर्माण केला.

तुकाराम महाराजांच्या परखड आणि प्रासादिक अभंग वाणीने महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या हृदयात आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे स्थान प्राप्त झालेले आहे. कारण त्याची वाणी हृदयस्पर्शी आहे. जगातील व्यवहाराचे सुक्ष्म ज्ञान तसेच परमार्थिक सत्याचे रहस्य त्यांच्या वाणीतून दिसून येते. त्यामुळे त्यांचे समाजप्रबोधन सर्व सामान्यांना आपलेसे वाटते. त्याकाळातील समाजामध्ये मोक्षमार्गाच्या नावाखाली होत असलेल्या भोंदूगिरीचा, कर्मठ कर्मकांडांचा तुकाराम महाराजांनी अतीशय तीव्र शब्दात समाचार घेतलेला त्यांच्या अभंगवाणीतून दिसून येतो. देवपुजा, कीर्तन, प्रवचन, धार्मिक अनुष्ठान इत्यादी साधनांचा केवळ पोटासाठी उपयोग करणाऱ्या पाखंडी लोकांवर तुकाराम महाराजांनी कडाडून टिका केलेली आहे. तुकाराम महाराजांची लेखनशैली मर्मग्राही व धारदार आहे. म्हणूनच त्यांच्या अभंगातील प्रत्येक चरण सर्वांच्या अंत:करणाचा ठाव घेतल्याशिवाय रहात नाही.

तुकाराम महाराजांच्या अभंग वाणीतुन सामान्यजनांचे प्रतिनिधीत्व प्रकट होते. ते सामन्यजनांप्रमाणेच विकारवश, भांडणारे, रुसणारे असुन सुध्दा नराचे नारायण झाले. यामध्ये तुकाराम महाराजांची अलौकिकता स्पष्ट होते. त्यामुळे आपलासुध्दा आत्मविश्वास जागा होईल. आपणही आत्मज्ञानी होऊ असे नाते प्रत्येक वारकऱ्याच्या मनात निर्माण करण्याचे सामर्थ्य तुकाराम महाराजांच्या अभंग वाणीतून प्रकट होते. त्याची अभंगवाणी पराकाष्ठिची आत्मपर व अंत:र्मुख असल्याने त्या अभंगावाणीमध्ये त्यांच्या पारमार्थीक चरित्राचे सम्यक दर्शन घडते. एका साध्या संसारीक मनुष्याचा आत्मसाक्षात्कारी संत कसा घडवला याचे सविस्तर चित्र त्या अभंगवाणीमध्ये पहावयास मिळते. जिव्हाळा, औचित्य आणि ओज यांची तुकाराम महाराजांची अंभंगवाणी प्रभावी झालेली आहे. साध्यासुध्या परिचीत शब्दांच्या माध्यामातून मार्मिक व परिणामकारकता चांगलीच साधलेली दिसून येते. तुकाराम महाराजांचे लक्ष वाङ्मय निर्मितीपेक्षा सामाजिक जीवन स्वच्छ करण्याकडे विशेषत्वाने होते म्हणून ते म्हणतात, उजळावया आलो वाटा.

आपल्या अभंग वाणीबद्दल तुकाराम महाराज म्हणतात. ते शब्द माझे पदरचे नाही. परमेश्वरी प्रेरणाच बोलत आहे. अंतरीचा रंग उमटे बहारी. देहू जवळच्या भंडारा डोंगरावर तुकाराम महाराज एकांतामध्ये नामस्मरण करीत व संध्याकाळी मध्यरात्रीपर्यंत संकिर्तन करीत त्यावेळी त्यांच्या मुखातुन ही अभंगवाणी प्रकट होत असे. त्यांच्याच शब्दांमध्ये
करीतो कवित्व म्हणतात हे कोणी ।
नव्हे माझी वाणी पदरीची ।

माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार ।
मज विश्वंभर बोलवितो ।।

तुकाराम महाराज कुणबी असून ब्रह्मज्ञान बोलतात. वेदांचा अर्थ सांगतात. म्हणून समकालीन वरिष्ठ वर्गांकडून त्यांना विरोध झाला. मंबाजीबुवांनी त्यांचा छळ केला. रामेश्वर भटांनी त्यांचे अभंग इंद्रायणी नदीमध्ये फेकुन दिले. तरीसुद्धा तुकाराम महाराजांवर विठ्ठलाचा वरदहस्त असल्याने सर्वांनी तुकाराम महाराजांचा द्रष्टेपण मान्य केले. ते आपल्या जीवनमार्गाचा खुलासा करतात.

तुकाराम महाराज दुसऱ्या अभंगामध्ये म्हणतात. जो मनुष्य उत्तम व्यवहारतून धन मिळवितो आणि उदार मनाने ते खर्च करतो त्याच मनुष्यास सद्‌गती प्राप्त होते. जो परोपकार करतो, जो पशुंचे पालन-पोषण करतो, जो परस्त्री आपल्या आई-बहिणी प्रमाणे मानतो, जो तहानलेल्यांना पाणी देतो, जो जेष्ठांचे महत्त्व वाढवतो त्यालाच मोक्षप्राप्ती होते. या अभंगामध्ये सर्व आध्यात्माचे सार तुकाराम महाराजांनी समजाऊन दिले आहे. मनुष्याने धन कोणत्या प्रकारे मिळवावे, त्याचा विनियोग कशाप्रकारे करावा, समाजातील स्त्रीयांशी कसा व्यवहार करावा, पशु-पक्षांवर कशी दया करावी, समाजातील थोरांचा कसा आदर-सत्कार करावा याचे सोप्या शब्दांमध्ये प्रबोधन केलेले दिसून येते. ढाल तलवारे गुंतले हे कर । या अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी युद्धामध्ये सैनिकाने कसे वागले पाहिजे याचे उत्तम रितीने प्रबोधन केले आहे.

कानडीने केला मराठी भ्रतार । या अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी विवाह करतांना कोणती काळजी घ्यावी याचे प्रबोधन केले आहे. या अभंगामध्ये तुकाराम महाराज सांगतात जो बायकोच्या आहारी गेला त्याला कुठेच मान मिळत नाही. लोभी मनुष्याती हातून आतिथ्य घडत नाही. अत्यंत आळशी, वैराग्यहीन मनुष्याच धिक्कार असो. त्याला नरकगतीच प्राप्त होते. साता दिवसांचा जरी झाला उपवासी । या अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी हरी भक्ती करावी, कोणाताही दुरधर प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नये. देहाचे तुकडे झाले तरी किर्तन सोडू नये. परमेश्वर चरणी असा दृढ विश्वास ज्याच्या जवळ असतो त्याच्या जवळ परमेश्वर नेहमी असतो. असे भक्तांसाठी प्रबोधन केले आहे. मांडव्याच्या दारा । पुढे आणिला म्हातारा ।। या अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी त्याला कोणत्यावेळी काय करावे ते कळत नाही, त्याच्या एखाद्या मंगल प्रसंगी काही उपयोग नाही असा बोध करुन दिला आहे. अशा प्रकारे अनेक विषयांवर तुकाराम महाराजांनी समाज प्रबोधन केलेले आहे.

– हिंदवी मिरेश बारसे (एफ.वाय.बी.ए.)




नकोस दुखवू रे
आईच्या भावना
तिने तुझ्यासाठी सोशिल्या रे
असंख्य वेदना ।

नको ठेच पोचवू
तिच्या अंतःकरणाला
तिनेच तुला जन्म देऊनी
जगाचा पट दाखविला ।

रात्रदिवस खपली
तुझ्या सुखासाठी झटली
नाही पाहिले स्वतःच्या रुपाकडे
फक्त पाहिले तुझ्या जीवन विकासाकडे

बाळ माझा मोठा होऊनी
नावलौकिक कमावू दे
हेच मागणे तिचे देवाकडे
जीवनात मिळेल सर्व काही

परंतु जन्मदात्री आई
मिळते एकदाच जीवनी
तेव्हा तू कर आदर
तिच्या प्रेमभऱ्या शब्दांचा

प्रेमवृक्षाची साऊली
हीच माझी माऊली !

# स्वप्नांची शक्ती



मोठं काही करण्यासाठी आपल्याला फक्त कृतीच करायची नसते तर स्वप्नही पहायची असतात. फक्त निश्चय करायचा नसतो तर विश्वासही ठेवायचा असतो. - एनातोली फ्रान्स

स्वप्न ती नाहीत जी तुम्ही झोपल्यावर पाहता. तर स्वप्न ती असतात जी तुमची झोप उडवतात. पण तुमची स्वप्न वास्तवात आणण्याकरीता तुम्हाला लख्खं जागं असणं आवश्यक आहे.

संपुर्ण मानवजातीच्या इतिहासामध्ये आत्ता ज्या संधी उपलब्ध आहेत त्या पूर्वी कधीच उपलब्ध नव्हत्या. मानवी जीवनातील गेल्या २० शतकातील अशक्य वाटणाऱ्या गोष्टींचा अनुभव एकविसाव्या शतकात आपण घेत आहोत. नवीन तंत्रज्ञान आणि शोध मानवाला पुढे घेऊन जात आहेत. मानवी क्षमतेच्या सीमा रुंदावत आहेत. हा अनुभव घेण्यासाठी उपलब्ध असलेला वेळ मात्र सारखाच आहे. त्यामुळे ही दोलायमान स्थिती आजचा तरूण अनुभवत आहे. आजच्या जगातील उपलब्ध असणाऱ्या अनुभवाच्या विस्तृत श्रेणींपैकी प्रत्येक गोष्टींचा फायदा घेण्याची तरुणांची इच्छा असते. आणि ती असायलाही हवी. पण ते शक्य होत नाही. त्यांना स्वत:ला एखाद्या विषयात प्राविण्य मिळवण्याच्या सीमेत बांधून घ्यावं लागतं. माझ्या मते हे योग्य नाही. माझं तर स्वप्न आहे की, या जगातील प्रत्येक तरुणाला हवा तितका या जगाचा अनुभव घेता यावा. पण ते कसं शक्य आहे ? हे शक्य करण्यसाठी दोन मार्ग  उपलब्ध आहेत. एक आपल्याकडे उपलब्ध असलेल्या वेळेमध्ये आपण काय करु शकतो यात वाढ करणं. दिर्घोद्योगी असणं आणि आपल्या क्षमतेत वाढ करं ही जीवनाची दोन ध्येय आजच्या तरुणाईला देऊ इच्छिते.  जेव्हा दोन्ही ध्येय कशासाठी मिळवायची हे समजता तेव्हा प्रत्येक गोष्टीसाठी दरवाजा उघडतो. हीच ती मोठी झेप आहे. ज्याची मानवता वाट पहात आहे. हीच झेप आपल्याला क्रांतीच्या उंच टप्प्यावर घेऊन जाईल. पण आपण ते कसं साध्य करु शकतो ?

पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही साधं आणि पवित्र जीवन जगा. असं जीवन तुम्हाला उतारवयात देखील निरोगी ठेवेल. ज्यामुळे तुमच्या आवडीच्या गोष्टींचा जास्तीत जास्त अनुभव घेण्याकरीता तुम्हाला जास्तीत जास्त वेळ उपलब्ध होईल. गेल्या काही वर्षांपासून वयोमानानुसार पार्किसन्स, अल्झायमर, कॅन्सर, हृदयविकार अशी अजारपण उद्भवायला लागली आहेत. यात समजुन घ्यायची महत्त्वाची गोष्ट अशी की, आजारपण उद्‌भवण्यासाठी अनेक वर्ष लागतात. पण त्याची बिजं तरुण वयातच पेरली जातात. त्यामुळे ही वेळ आली आहे निरोपणाची चळवळ सुरु करण्याची त्यासाठी प्रत्येक तरुणाने निरोगी विचार, निरोगी आहार अवलंबला पाहिजे. तुमचं जीवन हे ‘ईश्वराची देणगी आहे’. आणि पृथ्वीवरील कुठल्याही संपत्तीशी याची तुलना होऊ शकत नाही. मग वाईट सवय आणि व्यसनात ती वाया घालवायची ? चांगले आरोग्य राखा, वाईट सवयींपासून दूर रहा, चांगलं शिक्षण आणि कौशल्य आत्मसात करा. सक्षम आणि पात्र लोकांसाठी अनेक संधी वाट पहात आहेत. तुम्ही पुढे जा आणि त्यांचा पूर्ण लाभ घ्या.

## चारोळ्या

डोळे मिटुन प्रेम करते ती प्रियसी
डोळे मिटल्यासारखे करते ती दासी
डोळे वर करुन बघते ते ती पत्नी, अन्
डोळे मिटेपर्यंत प्रेम करते
ती फक्त अन् फक्त आईच...

दुसरी गोष्ट म्हणजे तुमच्या आयुष्याची जबाबदारी घ्या. तुमच्या पालकांची काळजी घ्या. इस्लाममध्ये देवावरील विश्वासानंतर दुसरी सर्वात उच्च गोष्ट कुठली असेल तर आपल्या आई वडिलांची काळजी घेणं, त्यांच्यावर प्रेम करणं. महंमद यांनी म्हटलं आहे 'स्वर्ग हा तुमच्या आईच्या पायात आहे'. याचा वेगळा अर्थ असा काढला गेला की मुलांना चांगला व्यवहार आणि धार्मिक जबाबदाऱ्या शिकवणं हे आईची जबाबदारी असुन ती पूर्ण केल्यास तिला स्वर्गाची प्राप्ती होईल. याचा अर्थ असा होऊ शकेल की, तुम्ही तुमच्या जीवनभर सेवा करुन स्वर्गामध्ये स्थान प्राप्त करु शकता. कुठल्याही पद्धतीने धर्म हा आईविषयी प्रशंसा, सन्मान आणि आदर दर्शवितो. एकदा का तुम्ही जागृत झालात आणि तुम्हाला तुमच्या जीवनाविषयी आणि तुमच्या पालकांविषयी जबाबदारीची जाणीव झाली की संपूर्ण विश्व तुमच्या बाजुने उभे राहील. हे साधं आणि सखोल असं सत्य आहे. या बाबत शंका नाही.

फक्त जास्त वेळ देणं आणि आपल्या आयुष्याची जबाबदारी घेणं एवढं पुरेसं नाही. आजुबाजूला उपलब्ध असलेल्या अपार नवीन संधी आणि संभावना यांचा फायदा घेण्यासाठी तुम्हाला दोन गोष्टींची आवश्यकता आहे. विश्वास आणि निर्धार ही दोन अत्यावश्यक चाकं आहेत. न्याया आधारे आपण आयुष्यातील संधी प्राप्त करु शकतो. याशिवाय जीवनाचा वास्तवीक अर्थ साध्य करता येणार नाही. आपलं ध्येय पूर्ण होणार की नाही याची खात्री नसेल तर, विश्वास ही अशी गोष्ट आहे, जी ध्येच्याचा पाठपुरावा करतांना बांधिलकी जीवंत ठेवते.

निर्धार ही अशी शक्ती आहे जी अडथळांतून आणि विमनस्क मन:स्थितीतून बाहेर काढते. यशासाठी अत्यंत आवश्यक असलेली इच्छाशक्ती निर्माण करण्यास ती मदत करते. पवित्र शास्त्रांमध्ये आणि वेदांमध्ये अशी माहिती आहे, की निर्धाराच्या शक्तीने प्रत्येक गोष्ट साध्य होते. निर्धाराची शक्ती ज्या वेळेस अखंडपणे काम करत असते तेव्हा आपोआपच निश्चित ध्येय प्राप्त होते.

तुम्हीही मनाशी हे पक्क करा, की काहीही झालं तरी तुम्ही जे ठरवलं आहे ते पूर्ण करणारच. जर तुमचा निर्धार पक्का असेल तर तुमच्या मार्गात कितीही अडचणी आपल्या तरी तुमचं लक्ष विचलित न होता एकाग्रपणे तुम्ही मार्गक्रमण करता. तुमच्या गरजेनुसार आजुबाजुची परिस्थितीत बदलणं हे सोपं नाही. पण जर तुमच्यामध्ये शक्ती आणि निर्धार असेल तर तुमच्या जीवनातील आव्हानांना यशस्वीरित्या तोंड देऊ शकाल आणि या प्रक्रीयेमध्ये कधी कधी जगालाही तुम्ही बदलू शकाल.

संयम आणखी एक महान गुण आहे. जो आपल्यामध्ये रुजवणं गरजेचं आहे. प्रामाणिक प्रयत्न संयम, नियमितपणा आणि निसर्गाविषयी प्रेम याकडे लक्ष द्यायला हवं. तुमच्यावर नकारात्मक शक्ती विजय मिळविणार नाहीत या बाबत तुम्ही सावध रहा. जेव्हा जेव्हा तुमच्या समोर अडथळा येईल तेव्हा तुम्ही धीरानं वागा. तुम्हाला तुमच्या खोलवर मनाची पकड ढीली न करता संयमाचा सराव करावा लागेल. तुम्ही चिकाटीनं काम केलं तर तुम्हाला अज्ञानाचा अंधार दूर करणारा प्रकाश सापडेल. एक अशी वेळ येईल ज्या वेळेस ज्या ज्या गोष्टी तुम्हाला माहिती असायला हव्यात त्या सर्व ज्ञात होतील. आपली आंतरिक ज्योत विझू देऊ नका.

मी परत स्वप्न बघायला सुरुवात करु का, या प्रश्नाला माझं उत्तर आहे की, संकटांना तोंड देतांना तुम्ही नेहमी दृढ असायला हवं, आशावादी असायलं हवं. तुम्ही कुठेही असा, तुमचं कितीही वय असू दे. तुमची स्वप्ने कधीही सोडू नका. चांगलं भविष्य तयार करण्यासाठी स्वप्न पाहणं कधीही थांबवू नका यासाठी तुमच्या विश्वासावर अटळ रहा. तुमचं व्यावसायीक कौशल्य विकसित करत रहा. कायम नाविण्याने बोट धरा. कठोर परिश्रम करा व उच्चतम चारित्र्य निर्माण करा. माझ्या आयुष्यातील अत्यंत आनंददायी अनुभव हे माझ्या स्वप्नांतून आणि माझ्या प्रामाणिक इच्छांमधूनच येणाऱ्या प्रत्येक संधीचं तुम्ही मनापासून स्वागत केलत तर जीवनात खूप काही मिळाल्याचा अनुभवन तुम्हाला प्राप्त होईल.

– हिंदवी मिरेश बारसे (एफ.वाय.बी.ए.)

## चारोळ्या

रस्त्यावरुन चालतांना
रस्त्यासारखं वागावं लागतं,
आपण कितीही सरळ चाललो तरी
वळणावर मात्र वळावंच लागतं...

---

नाती असावी शंख शिंपल्यासारखी
इवल्याश्या मोत्यालाही अलगद जपणारी
मैत्री असावी दवबिंदूसारखी
हिरव्या पानावरती आपले अस्तित्व
उजळून दाखवणारा...

# अहिल्याराणी होळकर एक चौफेर नेतृत्व



आहिल्याबाई होळकर यांनी केलेले सामाजिक कार्य महान आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक सामाजिक कार्ये केली. म्हणूनच त्या सामाजिक सुधारणा करणाऱ्या राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. आहिल्याबाई होळकर यांच्या काळात राज्यात सर्वत्र शांतता होती. त्या काळात पुष्कळ जाती-जमातीमध्ये व विशेषत: राजेरजवाड्यात महिलांना पडदानशीन ठेवण्याची पध्दती रुढ झाली होती. ती पध्दत आहिल्याबाई होळकर यांनी पाळली नाही. अशा पध्दतीच्या समाजातील रुढ चालीरितींना विरोध करणे सोपे नव्हते परंतु आहिल्याबाई होळकर यांनी ते धाडस दाखविले.

आहिल्याबाई होळकर धर्मसहिष्णू होत्या. सर्व धर्मांना त्या समान लेखत असत. हिंदुंना त्यांच्या धर्माप्रमाणे व मुसलमानांना इस्लाम धर्नानुसार न्याय देण्याची त्यांनी व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे तत्कालीन समाजात प्रजेला चोर, लुटारुंपासून उपद्रव होऊ नये अशी त्यांची इच्छा होती व त्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केलेले होते. आहिल्याबाई होळकर प्रजाहितदक्ष होत्या. त्यांनी आपल्या राज्यात प्रजेची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून अनेक ठिकाणी विहीरी बांधल्या होत्या. तसेच शेतीला व जनावरांना पाणी मिळण्यासाठी त्यांनी नदीचे पाणी अडवून तलाव देखील बांधले होते. जेणेकरुन शेतीसाठी, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी.

विहीरी व तलावांप्रमाणेच त्यांनी अनेक धार्मिक स्थळांवर जलकुंभ बांधले होते. तसेच नदीचा अंदाज न आल्याने अनेक दुर्घटना घडून अनेक मृत्यू ओढवत असत. या गोष्टीचा विचार करून त्यांनी तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी अनेक घाट बांधले होते. जेणे करुन तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाणाऱ्या स्त्री व पुरुषांना नदीच्या किनारी व्यवस्थित अंघोळ करता येत असे. तसेच प्रवाशांचीही सोय व्हावी म्हणून अनेक धर्मस्थळांच्या ठिकाणी धर्मशाळांचे देखील नियोजन आहिल्याबाई होळकर यांनी केले होते.

आहिल्याबाई होळकर यांनी गावे एकमेकांशी जोडण्यासाठी अनेक नद्यांवर पुल बांधण्याची कामे देखील केली आहेत. त्यामुळे अनेक गाव व शहरे एकमेकांशी जोडल्या गेली व त्यांच्यामधील व्यापारवाढीला चालना मिळाली, राज्याची प्रगती झाली. अठराव्या शतकात आहिल्याबाई होळकरांनी यांनी स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या राज्यात सैनिकी प्रशिक्षण सुरु केले होते. केवळ पुरुषच नव्हे तर स्त्रीयांनाही सैनिकी प्रशिक्षण दिले व त्यांना सैन्यात सामिल करुन घेतले होते. अशाप्रकारे स्त्री-पुरुष समानता आणण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या राज्यात केल्याचे दिसून येते.

आहिल्याबाई होळकर यांनी आपल्या काळात सर्वधर्म जपण्याचा देखील प्रयत्न केलेला दिसुन येतो. त्यांची ही धार्मिक उदारता पाहून निजामांच्या राज्यातील मुसलमान आहिल्याबाई होळकर यांच्या आश्रयाला येऊन राहीले. त्यांनी मुस्लिम संतांना जमिनी देऊन मस्जिद, दर्गे ही बांधून दिले. अहिल्याबाई आपल्या राजधानीत म्हणजे महेश्वर येथे सर्व जाती-धर्माच्या कलावंतांना बोलवत व त्यांचा सत्कार करत. त्यात वैद्य पंडित, ज्योतिबा, मुल्ला, मौलवी हे सर्व असत अशा प्रकारे त्यांनी आपल्या राज्यात समभाव जपण्याचा प्रयत्न केला.

आहिल्याबाई होळकर यांचा काळ सर्वार्थाने स्त्रीदास्याचा काळ होता. स्त्रीयांवर अनेक बंधने होती. सतीची वाईट चाल आणि पतिव्रतेच्या भ्रामक कल्पना यामुळे पतीच्या मृत्युबरोबरच स्त्रीने आपलेही आयुष्य संपवावे असे अपेक्षित असे. मुलगी आठ वर्षांची झाली की तिचे लग्न केलेच पाहिजे शिवाय या मुलीच्या किती सवती असतील यावर निर्बंध नव्हता. वयस्कर विधवा स्त्रीला आपल्या संपत्तीचा विनियोग करण्याचा अधिकार नव्हता. लग्न बंधनातही परंपरावादी विचार होता. हुंड्याची जीवघेणी प्रथाही होतीच. आहिल्याबाई होळकर यांनी विधवांना दत्तक घेण्याची मुभा दिली होती हे सर्व पाहता असे लक्षात येते की, आहिल्याबाई होळकर यांनी स्त्रीदास्य मिटवण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत.



# व्यक्तिमत्त्व विकास

व्यक्तिचा शारीरीक, मानसिक, भावनिक व सामाजिक विकास होत असतो. या विकासातून त्याचा पिंड घडत असतो. व्यक्तिचा हा घडलेला पिंड म्हणजे व्यक्तिमत्त्वाबाबत विशेष माहिती स्पष्ट होण्यासाठी पुढे काही व्याख्या दिल्या आहेत.

व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वत:च्या परिसराशी व्यक्तिचे जे वैशिष्ट्यपूर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभूत असणारी व वर्तनाला चालना देणारी शारीरिक, मानसिक यंत्रणेची संघटना होय.

व्यक्तिमत्त्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळा बेरीज होय. व्यक्तिमत्त्व म्हणजे सामाजिक उद्दीपन मूल्य. व्यक्तिमत्त्वाचा विकास : शरीराचा रंग व ठेवण, बुध्दी इत्यादी गोष्टी घेऊन व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला अनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. व्यक्तिकडे असलेल्या उपजत अशा बाबींना जैविक बीजे म्हणता येईल. जीवन जगत असतांना विविध बाह्य घटकांचा, प्रामुख्याने सामाजिक घटकांचा व्यक्तिच्या विकासावर परिणाम होत असतो. जैविकबिजे आणि बाह्यघटक यांच्यातील आंतरक्रियेचा परिपाक म्हणजे व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व होय. अर्थात व्यक्तिमत्त्व विकासात अनुवंशिकता आणि वातावरण या दोन्हींशी संबंधित घटकांचा वाटा असतो. व्यक्तिमत्त्व विकासात वाटा असणारे अनेक घटक पुढील प्रमाणे - शरीररचना : काही व्यक्तिंना उंच,धिप्पाड तर काहींना बुटके शरीर लाभलेले असते. काही व्यक्तिंचे शरीर सुडौल आणि व्यंगरहीत असते तर काहींच्या ठिकाणी शारीरिक व्यंगे असतात. व्यक्तिच्या शरीररचनेचा तिच्या समायोजनावर चांगला अथवा वाईट परिणाम होतो. उत्तम शरिरयष्टी व आकर्षक चेहरा असणाऱ्या व्यक्तींचा चेहरा इतरांवर लवकर प्रभाव पडतो. उत्तम शरीरसंपत्तीच्या बळावर व्यक्ती नेता बनु शकतो.

काही व्यक्ती अतिशय बारीक असतात. लहानपणी मी फार हडकुळा होतो. माझे वडील मला नेहमी म्हणत हा एकेरी हाडाचा आहे. त्यामुळे हा बारीक आहे. परंतु सतत १५ वर्ष व्यायाम करुन माझे शरीर दुहेरी हाडाचे झाले. म्हणजे एकेरी हाड आणि दुहेरी हाड हा काही फरक नसतो हे मला १५ वर्षांनंतर कळाले. या मागे मला एकच सुचवायचे आहे की, व्यक्ती लहानपणी बारीक जरी असेल परंतु योग्य आहार आणि नियमित व्यायाम यामुळे आपणांस शरीर भारदस्त बनविता येते. यासाठी सर्वांनी नियमित व्यायाम, योगासन व प्राणायाम करणे आवश्यक आहे.

अंतस्त्राव ग्रंथी : कंठपिंडातून जास्त स्त्राव होऊन रक्तात मिसळला तर वर्तनात अस्थिरता व चांचल्य दिसून येते. हा स्त्राव कमी झाला तर व्यक्ती सुस्त बनते. वृकस्थ पिंडातील स्त्रावामुळे भावनिक उद्रेकांच्या समयी शरीरावर ताबा राहतो. जननग्रंथीतील स्त्राव कामासना वाढवितात. थोडक्यात हे लक्षात घ्यावयास हवे की, व्यक्तिमत्त्व विकासात अंतस्त्राव ग्रंथींचा मोठा वाटा आहे.

विविध क्षमता : बौध्दिक क्षमतेचा व्यक्ति विकासावर फार परिणाम होतो. ज्या गोष्टी तैल बुध्दीच्या व्यक्ती सहज करु शकतात त्या गोष्टी मंद बुध्दीच्या व्यक्तींना जमत नाही. एखाद्या व्यक्तीच्या बुध्दीची चमक दिसताच अन्य व्यक्ती प्रभावीत होतात. बुध्दीसामर्थ्याने कोणतीही व्यक्ती इतरांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करु शकतो. अभिक्षमतेमुळे व्यक्तिमत्त्व परिपुष्ठ होण्यास मदत मिळते.

कुटूंब : घर हाच मुलांना पहिला सामाजिक परिसर होय. आई वडिल व कुटूंबातील अन्य व्यक्तींच्या वर्तनाचा तसेच घरातील एकूण वातावरणाचा मुलांच्या वर्तनावर फार परिणाम होतो. मुलांच्या योग्य व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्याची मातृप्रेमाची गरज योग्य त्या प्रमाणात लहानपणी भागविली जाणे आवश्यक असते. ज्या मुलाला प्रेमळ, वत्सल, सद्वर्तनी, फाजील लाड न करणारे व अपत्याच्या योग्य विकासाची काळजी घेणारे आई वडिल लाभतात त्यांचे व्यक्तिमत्त्व निश्चितच आदर्श होते.  या उलट आई वडिलांचा आवश्यकतेपेक्षा जास्त दरारा असेल, मुलाला कोणतेही स्वातंत्र्य लाभत नसेल तर अशी मुले भित्री, कातर स्वभावाची होतात.

ज्येष्ठ मुले दादा बनण्याच, शेंडेफळे जास्त हेकट होण्याची तर मधली मुलं आक्रमक होण्याची शक्यता असते. एकुलत्या एका मुलाला आपल्या बरोबरीच्या मुलांचा सहवास न लाभल्यामुळे अकाली प्रौढत्व येतं. लहानपणीच मुलांकडून पालकांनी ग्रामगीता, ज्ञानेश्वरी, विविध आरती संग्रह, हरीपाठ करून घेतले तर मोठेपणी आपोआप मुलांवर चांगले संस्कार होतात. मुलांना वयाच्या १० वर्षांपासून नियमित योगासने व व्यायामाची सवय लावावी.

शेजारी व मित्र : घराबाहेर पडता येऊ लागल्यावर मुले आजुबाजूच्या समवयस्क मुलांबरोबर खेळू लागतात. चांगल्या मित्रांच्या सहवासात असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे चांगले पैलू पडत जातात. तर वाईट मुलांच्या संगतीत असणारे मुले दुवर्तनी होऊ लागतात. 'संगती सगदोषोण' असे म्हटलेच आहे.

शाळा : शाळा म्हणजे छोटेखानी समाज होय. वयाच्या सहाव्या वर्षी मुल प्राथमिक शाळेत जाऊ लागते. तत्पूर्वी काही मुलं माँटेसरी, अंगणवाडी, प्लेग्रुप, बालवाडी यासारख्या शाळांमधून गेलेली असतात. घराच्या वातावरणापासून शाळेच्या वातावरणात आलेली मुले सुरुवातीला भांबावलेल्या अवस्थेत असतात. हळूहळू ते शालेय जीवनाशी समायोजन साधू लागतात.

शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व : विविध विषयावर अभ्यास परिपाठ, अभ्यासपूरक व सहशालेय कार्यक्रम, खेळ, क्रीडा, कवायत इत्यादिंचा मुलांच्या वर्तणावर परिणाम होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व घडू लागते. प्रेमळ व कर्तव्यदक्ष शिक्षक आवडते ठरतात तर रागीट व लहरी शिक्षक आवडत नाहीत. सुख, दुःख, यश, अपयश, मान, अपमान इत्यादी अनुभव आता प्रकर्षाने येऊ लागतात व या सर्वांचा व्यक्तिमत्त्व विकासावर निश्चितच चांगला परिणाम होतो. मुलांवर चांगले संस्कार घडावे यासाठी मूल्य शिक्षण शासनाने सुरु केले आहे. यासाठी शाळेत कब बुलबुल पथक, स्काऊट गाईड पथक स्थापन करण्यात यावे. नियमित बालसभा, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडास्पर्धा, योगासन वर्ग नियमित होणे गरजेचे आहे.

समाज व संस्कृती : सुसंस्कृत समाजात वाढणारी मुले व वैचारिक पातळीने मागे असलेल्या समाजात वाढणारी मुले यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाचे फरक आढळतात. सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाचा व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम होतो.

व्यक्तिमत्त्व सुधारणा : व्यक्तिमत्त्व सुधारणा करण्याच्या दृष्टीने खालील सूचना लक्षात ठेवणे व त्यावर अंमलबजावणी करणे उपयुक्त ठरेल. व्यायाम आणि सकस आहार घेऊन आपले शरीर निकोप आणि पिळदार बनविता येते. काळा रंग व बसके नाक असुनही व्यक्तिचे शरीर पिळदार असेल तर या व्यक्तिचे व्यक्तीमत्त्व निश्चित प्रभावी होईल. नेहमी हसतमुख असणारी व गोड बोलणारी व्यक्ती आपल्याला आवडते. सर्वसाधारण कपाळावर आठ्या असलेल्या, दुर्मुखलेल्या व्यक्तिचा सहवास आपल्याला आवडत नाही. आपली वृत्ती आनंद ठेवणे व गोड बोलणे फारसे कठीण नाही.

'एक नूर आदमी और दस नूर कपडा' असे म्हणलं जातं. आपण योग्य ते कपडे परिधान केले तर आपले व्यक्तिमत्त्व उठून दिसते. शरीर स्वच्छ ठेवणे, योग्य केशरचना करणे, नीटनेटके कपडे वापरणे हे प्रत्येकाच्या स्वाधीनचे आहे. या गोष्टींमुळे व्यक्तिमत्त्व प्रभावी होते. समाजात मान्यता पावलेल्या कृतीनैपुण्यापैकी एखादे कृतीनैपुण्य संपादन करणे कुणालाही शक्य आहे. इतरांना आवडेल असे काहीना काही प्रत्येकाला करता येईल व स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा दर्जा सुधारता येईल. व्यक्तिमत्त्व सुधारण्याचा प्रयत्न करीत असतांना स्वतःला चांगले ओळखलेले असणे जरुरी आहे. स्वतःच्या कुवतीची दखल न घेता, कुठलाही प्रयत्न न करण्यापूर्वीच ' मला जमणार नाही' असा ग्रह करून घेणे हे बरोबर नाही. मैदानावर एका मुलाला तू का खेळत नाही असे शिक्षकाने विचारले तर तो मुलगा म्हणाला, मला हा खेळ जमणार नाही. इतर मुले मला हसतील. त्याच्या मनातील न्यूनगंडाने त्याला तो खेळ खेळण्यापासून रोखले. प्रत्येकाने आपल्या जवळ असणाऱ्या गुणांची ओळख करून घ्यावी आणि ती वाढीला लावण्यासाठी प्रयत्न करावा. आपण कोणतेही काम करत असतांना सोपविलेले काम व्यवस्थित केल्यास आपणावर दुसरा व्यक्ती रागावणार नाही. मात्र विनाकारण कोणी रागावत असेल तर आपण ती गोष्ट खपवून न घेता त्या व्यक्तीला ती गोष्ट निदर्शानास आणून देणे आवश्यक असते. म्हणजे कालांतराने त्या व्यक्तिला स्वतःची चुक कळेल. आपले स्वतःचे चुकले असेल तर आपण ती चुक मान्य केली पाहिजे व आपल्या हाताने जी चुक झाली अशी चुक आपल्या हातून पुन्हा घडणार नाही याचा विचार आपण अगत्याने केला पाहिजे. काही लोक स्वतः काम न करता उपदेश देत राहतात मात्र अशा व्यक्तिचे कोणी ऐकत नाही. म्हणून स्वतः आदर्श काम करून मग दुसऱ्यांना सांगावे.

आपण आपले व्यक्तिमत्त्व सुधारणेसाठी अनेक थोर व्यक्तिंचे जीवन चरित्र वाचत राहिले पाहिजे. थोर व्यक्तिंनी आपले जीवन कसे घडविले, त्यांनी कोणकोणते कार्य केले आहे. आपले स्वतःचे जीवनमान

कसे उंचावले आहे यावरून आपण आपले सुध्दा व्यक्तिमत्त्व सुधारु शकतो. शिक्षकांनी वर्गात नियमितपणे आठवड्यातून एकदा बालसभा घेऊन आपल्या वर्गातील मुलांना बालसभेत कसे बोलायचे याचा सराव दिल्यास अशी मुले मोठेपणी कोठेही कोणत्याही विषयावर बोलू शकतात व व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा निश्चितच विकास होतो. व्यक्तिने आपल्या गुण-दोषांची योग्य दखल घेऊन त्यात इष्ट असे बदल करण्याचा सतत प्रयत्न केला तर व्यक्तिमत्त्वाची सुधारणा बऱ्याच प्रमाणात होऊ शकते.

- मोहिनी रामचंद्र सोनवणे (टि.वाय.बी.कॉम.)




जी माणसे हवीशी वाटतात,
ती कधी भेटत नाहीत.
जी माणसे नकोशी वाटतात,
त्यांचा सहवास संपत नाही.
ज्यांच्याकडे जावेसे वाटते,
त्यांच्याकडे जायला जमत नाही.
ज्यांच्याकडे जाऊ नये असे वाटते,
त्यांच्याकडे जावेच लागते.
जेव्हा जीवन नकोसे वाटते,
तेव्हा काळ संपत नाही.
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो,
तेव्हा काळ संपलेला असतो.
नशीब हे असेच असते,
त्याच्याशी जरा जपून वागावे लागते.
तिथे कोणाचेच काही चालत नाही,
जिकडे तिकडे जावेच लागते.

# चारोळ्या

हार न मानता
हार न मानता
पुन्हा लढण्याची
ज्याच्या अंगी असते 'रग'
त्याच्या पायी अखेरीस
झुकले जाते सारे जग.

---

आयुष्यात या प्रत्येक क्षणाला
परीक्षा आपली असते
गुन्हा दुसऱ्याचा असला तरी
त्याची शिक्षका आपली असते

---

पुन्हा उठुन जो लढण्यासाठी
निर्भिड उभा राहिल
अशा ठेवुन त्याच्याकडेच
सारे जग त्याला पाहिल

---

प्रत्येकाच्यात असते क्षमता
स्वप्ने खरी करण्याची
स्वत:साठी जगता जगता तयारी
दुसऱ्यासाठी मरण्याची

---

जो उभा राहिल पुन्हा
दाखवून मनाची हिम्मत
येशस्वी होवून चुकती करेल
या मानव जन्माची किंमत

# कृषीक्षेत्रातील भविष्यातील संधी







आपल्याकडे परंपरागत शेती जरी नसली तरी कृषी क्षेत्राशी निगडित करिअर करण्यास आपण उत्सुक असला तर आपण व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण प्राप्त करुन क्षेत्रात भविष्य साकारु शकतो. कृषी आणि या क्षेत्राशी निगडित बाबींचा आपण विचार करुया.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशातील ६० ते ७० टक्के जनता आजही ग्रामीण भागात राहते आणि शेती हे त्यांच्या उपजिविकेचे साधन आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या पारंपारिक शेतीकडे कल राहिला आहे. परंतु अलीकडच्या काळात कृषी क्षेत्रात कल राहिला आहे. अमुलाग्र बदल झाल्याने शहरातील युवकांसाठी हे क्षेत्र रोजगारासाठी उपयुक्त ठरत आहे. बदललेल्या काळानुसार विज्ञान आणि तंत्रज्ञान हे शेतीच्या विकासाला पुरक ठरत आहे. शेती आणि पशुपालन हा ग्रामीण भागातील आत्मा मानला जातो. बदलत्या काळात शेती उद्योगाला अधिकाधिक लाभदायक करण्यासाठी अनेक योजना सरकारकडून राबविल्या जात आहेत.

शेतकरी जगला तर देश जगेल, असे म्हटले जाते. कारण देशाची अर्थव्यवस्था मुळातच शेतीवर अवलंबुन आहे. चांगले पीक आले तर देशात सुबत्ता नांदते. अन्यथा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. म्हणूनच शेती देशाच्या अर्थव्यस्थेत मोलाचे योगदान देत आहे. पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळ्यातही कठोर मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत खूप बोलले जाते, लिहिले जाते. प्रत्यक्षात शेती करण्यास शहरी मंडळी उत्सुक नसतात. मात्र हे चित्र आता बदलत चालले आहे. अर्थात आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगाच्या प्रगतीने कृषीक्षेत्रही अपवाद राहिलेले नाही. शेती म्हणजे केवळ मेहनत ही संकल्पना मागे पडू लागली आहे. कमी श्रमात कृषी क्षेत्रातून अधिक उत्पन्न घेणे अलिकडच्या काळात शक्य होऊ लागले आहे.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या उपयोगातून कृषी क्षेत्रात शारीरिक श्रमावरची अवलंबता कमी होऊ लागली आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ आणि खर्चात कपात होऊ लागली आहे. कृषी यंत्राच्या वाढत्या उपयोगामुळे आणि उत्तम व्यवस्थापनामुळे कृषी क्षेत्र हे चांगल्या उत्पन्नाचे माध्यम बनत चालले आहे. गेल्या काही वर्षात शहरातील युवकांशी देखील कृषी क्षेत्राकडे रुची दाखविण्यास सुरुवात केली आहे. चांगला अनुभव बाळगणारा युवक गावात जाऊन शेती उद्योग करतांना दिसून येत आहे. तंत्रज्ञान आणि सायंटिफिक इनपुटमुळे कृषी क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या अनेक पर्यायांबरोबर आरोग्यदायी जीवनशैलीचा अनुभव घेण्याची देखील संधी असते. जय आपल्या अंगी मेहनतीची तयारी असेल, कौशल्य ज्ञान असेल तर आपणही कृषी क्षेत्रात संधी आजमावू शकतो.

कृषी क्षेत्रातील संधी : करिअरची चर्चा होत असतांना विज्ञान आणि मॅनेजमेंटमध्ये सर्वाधिक संधीची शक्यता दिसते. त्याचवेळी कृषी क्षेत्र हे असे क्षेत्र आहे की ज्या ठिकाणी सायन्स आणि इंजिनिअरींग, मॅनेजमेंटबरोबरच सोशल सायन्सची पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना अनेक संधी आहेत. कृषी, फूड इंडस्ट्रीत बायोलॉजी, केमिस्ट्री, फिजिक्स, मॅथ्स आणि स्टॅटस्टिकचा अभ्यास करण्यासाठी करिअरचे अनेक पर्याय आहेत. जर आपण इकोनॉमिक्स आणि बिझनेस मॅनेजमेंटच्या अभ्यासात रुची बाळगत असाल तर कृषी क्षेत्रात यशस्वी करीअर करु शकतो.

अॅग्रीकल्चर सायन्सच्या अभ्यासानंतर अॅग्री बिझनेस,

आर अँड डी ऑर्गनायझेशन, पब्लिक आणि प्रायव्हेट एजन्सी, सरकारी आणि पॉलिसी मेकिंग एजन्सी या ॲग्रिकल्चर प्रोफेशनशी जोडता येतात. ॲग्रिकल्चर सायन्सचा विचार केल्यास हे शास्त्र विविध प्रकारचे पीक उत्पादन, फार्मिंग गुणवत्ता पिकांच्या उत्पादनात वाढ, श्रम कमी करणे, माती आणि जल संरक्षण, किटकनाशक यासारखे कार्य करण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते आणि त्यात कुशल तज्ज्ञांची कृषी क्षेत्राला नेहमीच मागणी राहिली आहे.

कृषी क्षेत्रात करिअरची संधी : फुड सायन्स आणि टेक्नॉलॉजी, ॲग्रिकल्चर सायन्स किंवा टेक्नॉलॉजीच्या अभ्यासासाठी विज्ञान विषयांसह १२ वी पास असणे गरजेचे आहे. पदवीनंतर ॲग्री बिझनेसचा अभ्यास करता येतो.

फूड सायन्स : फूड सायन्स आणि टेक्नॉलॉजी, फूड मॅन्युफॅक्चरिंग, प्रोसेसिंग, ट्रिटमेंट, प्रिजर्व्हेशन आणि डिस्ट्रीब्युशनशी निगडित विज्ञान शाखा आहे. अप्लाईड सायन्सच्या या शाखेत बायोकेमिस्ट्री, फिजिकल सायन्स आणि केमिकल इंजिनिअरींगच्या अभ्यासाचा समावेश होतो. वेगाने होणारे शहरीकरण आणि बदलत्या जीवनशैलीमध्ये खाद्य सामुग्रीची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी फूड सायंटिस्टची भूमिका महत्त्वाची आहे.

प्लांट सायन्स : प्लांट सायन्सशी निगडित प्रोफेशनच्या कार्यक्षेत्रात ॲग्रोनॉमी, एन्वायमेंट सायन्स, प्लांट ब्रिडिंग आणि ऑटोमोलॉजीशी संबंधित असतो. प्लांट सायन्सच्या अभ्यासात मुख्य रुपाने स्वाईल सायन्स आणि प्लांट बायोटेक्नॉलॉजीस्ट फोकस केले जाते. प्लांट बायोटेक्नॉलॉजीस्ट पिकांच्या उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्नशील असतो. शेतीतील दुष्काळ पिकावरील रोग आणि नैसर्गिक आपत्तीचे निदान करण्यासाठी दीर्घकालीन उपाय शोधने आणि बियाणाच्या विकासासाठी प्लांट बायोटेक्नॉलॉजीस्टची भूमिका महत्त्वाची असते.

ॲनिमल सायन्स : शेतीबरोबरच जोड व्यवसाय हा शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे साधन मानले जाते. त्यात प्रामुख्याने पशुपालनचा यात समावेश होतो. शेतकरी विशेषत: गाय, म्हशी, शेळ्या, कुक्कुटपालन करुन चांगले उत्पन्न मिळवू शकतात. जर आपल्याला लाईव्हस्टॉक प्रॉडक्शन आणि मॅनेजमेंटमध्ये रस असेल तर आपण ॲनिमल सायंटिस्ट जनावरांच्या न्यूट्रिशियन सेफ्टी आणि विकासाकडे लक्ष देते. या विषयांतरर्गत जनावरांचे जेनेटिक्स, न्युट्रिशयन, रि-प्रॉडक्शन ग्रोथ आणि डेव्हलपमेंटचा अभ्यास करावा लागतो.


सॉईल सायन्स : ॲग्रिकल्चर सायन्समध्ये सॉईल म्हणजे माती परीक्षण अभ्यास. हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. हे एक प्रकारचे प्लांट सायन्सशी निगडीत कार्यक्षेत्र आहे. सॉईल सायन्सचा अभ्यास हा कृषीबरोबरच पार्यावरण शास्त्र आणि अर्थ शास्त्र यांच्याशी थेटपणे जोडला आहे. स्पेशलायजेशन करतांना सॉईल फॉर्मेशन, साईल क्लासिफिकेशन, सॉईल मॅपिंग आणि प्रॉपर्टिज (फिजिकल, बायोलॉजिकल आणि केमिकल) सॉईल फर्टिलिटी, इरोजन आणि सॉईल मॅनेजमेंटचा विस्तृत अभ्यास करावा लागतो.

बिझनेस मॅनेजमेंट : संशोधन आणि विकासाबरोबरच कृषी क्षेत्रातील उद्योग आणि व्यवस्थापन हे थेटपणे एकमेकांशी जोडले गेले आहेत. या कारणांमुळेच कृषी क्षेत्राशी निगडित प्रोफेशनल किंवा उद्योजक ही करिअरसाठी संधी शोधत असतात. देशातील निवडक हे करिअरसाठी विद्यापीठांत, शैक्षणिक संस्थांत ॲग्री-बिझनेस मॅनेजमेंट हा एक लोकप्रिय अभ्यासक्रम म्हणून शिकवला जातो. या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी सायन्स किंवा कॉमर्सची पार्श्वभूमी असावीच असे नाही. जर आपल्याला या क्षेत्रात जायचे असेल तर आपल्याला मार्केटिंग, टेक्निकल सेल्स, मर्कडाईन, इकोनॉमिस्ट, अकाऊंटस, फायनान्स मॅनेजर, कमोडिटी ट्रेडर्स आदी रुपातून करिअर करु शकता.

अन्य करिअरचे पर्याय : हॉर्टिकल्चर, डेअरी, फार्मिंग, फॉरेस्टी आणि वाईल्ड लाईफ, पर्यावरण, पेस्टिसाईड ॲड केमिकल रिसर्च व्हेटरनरी सायन्स, ॲनिमल, हस्बेंडरी, ॲग्रिकल्चर इकोनॉमिक्स, ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट, एज्युकेशन आणि सोशल सर्व्हिसेस आदींचा समावेश आहे.

– मोहिनी रामचंद्र सोनवणे (टि.वाय.बी.कॉम.)

# हरवलेले बालपण



आपल्या सर्वांनाच आपल्या बालपणाच्या आठवणी रम्य भूतकाळात घेवून जातात. बहुतेक सर्वांचे बालपण मग ते श्रीमंत असो वा गरीब, मुलगा असो वा मुलगी. त्यांचे बालपण असंख्य गोड-कडू आठवणींनी भरलेले असते. त्या सर्व आठवणींची गोळाबेरीज करुन बहुतेक सर्वांनाच गोड आठवणी लक्षात राहतात आणि म्हणुनच मला वाटते कि, बालपणीच्या आठवणी सर्वांनाच रम्य वाटतात. माझ्यासाठी बालपण हा नेहमीचाच कुतूहलाचा विषय राहिला आहे.  बालपण हे फक्त एकदाच येते आणि कदाचित त्यामुळे सर्वांनाच ते फार हवेहवेसे वाटते आणि सर्वच जण त्या आठवणी जपून ठेवातात. केव्हातरी शांत बसावं आणि वयानुसार आपण काय काय गोष्टी सोडल्या याचा आढावा घ्यावा. मग लक्षात येतं, की ''आपण गाभुळेली चिंच अनेक वर्षात खाल्लेली नाही. जत्रेत मिळणारी पत्र्याची शिट्टी वाजवलेली नाही. चटक्यांच्या बिया घासून चटके द्यावेत असे वाटत नाही. तसेच कापसाची म्हातारी पकडण्याचा आनंद ही राहिलेला नाही. कापसाच्या म्हातारीने उडता उडता आपल्या बालपणीचा सुखाचा काळ स्वत: बरोबर कधी नेला ते आपल्याला कळालंच नाही.''

खरंच बालपणीचा काळ किती सुखाचा ना ? आयुष्यातील अनमोल क्षणांची आठवण ते क्षण निसटून गेल्यावरच त्याची किंमत कळते. पण बालपणीच्या काही आठवणी मनाच्या कोपऱ्यात अजूनही दाटलेल्या असतात. काही गोड क्षण आजही आठवले तरी हसू येतं. आपलं मनही किती विचित्र असतं ना ? जेव्हा लहान असतो तेव्हा पटकन मोठे व्हावेसे वाटते. शाळा सोडून बाबांसारखे ऑफीसला जावेसे वाटते तर दादा सारखं कॉलेजला जावसं वाटतं. मुलींनाही आईसारखी साडी नेसून स्वयंपाक करायला आणि ताईसारखं नट्टाफट्टा करायला आवडतं. मात्र आता पुन्हा ते बालपणीचे दिवस आठवतात आणि नकळत डोळ्यात पाणी येतं.

लाटेनी, की काळाने नेला तो किनाऱ्यावरचा किल्ला? भोवऱ्याच्या रस्सीला लावलेला तो कोल्ड्रींगच्या झाकणाचा बिल्ला... हरवली कुठे ती शाळेतील मूल्यशिक्षणाची वही, इवलुशा मार्कांच्या प्रगतीपुस्तकावर मारलेली बाबांची खोटी सही.... गेले कुठे ते चालतांना ''पॅकपॅक'' करणारे पायातले बूट? '' मी नाही देणार जा माझं चॉकलेट'' म्हणत आवळलेली ती घट्ट मुठ.... किती जिव्हाळा होता डोकं टेकवलेल्या आईच्या हाताच्या कुशीत ? ब्लँकेटहून जास्त उब होती त्या मायेच्या कुशीत.... हरवलेला तो प्रेमाचा घास.... ''चिऊताई'' दाखवत आईने भरविलेला... घरात न सांगता भेळ खायचा तो प्लॅन ठरवलेला... गेले कुठे जत्रेतले ते गोड म्हातारीची केस ? छोट्याश्या बुटांची आईने बांधलेली सुटलेली लेस... गेली कुठं ती मामांच्या गावी जाणारी झुकझुक गाडी ? हरवली कुठे ती क्रिसमस मधील झिंगलमॅनची दाढी? धावत धावत ज्याचा पाठलाग केला तो धूरवाल्याचा धूर कुठे गेला ? शाळेत बडबड गीते गातांना एकत्र लावलेला तो सूर कुठे गेला ? झोपेतांना पाहिलेला तो चांदोमामा कुठे हरवला ? अ आ इ ई पाठीवर लिहिणारा तो खडू कुणी पळवला ? कशाला आलं आपल्याला हे शहाणपण ? हरवलं त्यात सुंदर बालपण...

'बालपण' या जगातील सगळ्यात सुंदर आठवण. बालपण म्हणाले,की पकडापकडी, खो-खो पासून अगदी व्हिडीओ गेम, क्रिकेट पर्यंत सगळे विषय आठवतात. शाळेत केलेला दंगा, सुट्टीत केलेली मस्ती, गावाला केलेली मजा आणि त्या बद्दल खाल्लेला मार सगळं काही नीट आठवते. तसेच विटी-दांडू, गोट्या,

चिंचुके, सुरपारंबी हे आमचे आवडीचे खेळ असत. क्रिकेटपण खेळायचो पण जास्त नाही कारण क्रिकेट खेळतांना कॉलनीतील लोकांच्या जाम शिव्या बसायच्या व नेहमी आमचा बॉलपण जप्त व्हायचा, पैसे नसल्यामुळे नवीन बॉल आणायला परवडत नसायचं. मग जुने पायमौजे घेऊन त्यात चिंध्या भरायच्या व त्याचा बाल करायचो  कारण मग तो हरवला तरी दु:ख होत नसायचे. कारण ते दिवस असतातच सोनेरी. कधी दुकानातून २ रुपयाच्या चार पेप्सी विकत घ्यायचो, तर कधी त्या पोंगा विकत घ्यायचो आणि बोटात घालून राक्षस राक्षस खेळायचो. गोट्यांमध्ये तर आपला नेम अचूक असायचा आणि भोवऱ्यामध्ये हातजाळीमध्ये तर आपला हात कोणीच पकडू शकत नाही. घराच्या अंगणात लुडो, बुध्दीबळ, चोर-शिपाई, पत्ते, चंपलआठ, सापसीडी, व्यापर असे खेळ खेळायचा मात्र ‘चिमणी उड’ हा मात्र आमचा आवडीचा खेळ होता. पण आता ते दिवस गेलेत, आता स्मार्टफोन आलेत. आता आपण फोनवर गेम खेळतो.जुने खेळ संपत आहे. मे महिना संपतोय, उन्हाळ्याची सुट्टी संपतीय. सुट्टी..... ती तर लहानपणी असायची ना आठवतंय आपण लहानपणी किती खेळ खेळायचो. डोळ्यावर पट्टी बांधून समोरच्याला पकडायचो. शाळेतच्या नंबरपेक्षा आपण क्रिकेटमधल्या नंबरला जास्त महत्त्व असायचं. तीन उभ्या रेषा व एक आडवी रेषा मारुन त्याला आपण स्टंप म्हणायचो. नंबर जरी ठरला असला तरी ज्याची बॅट तोच पहिला बॅटींग करणार म्हणून आपण चिडायचो. विट्टी खूप लांब मारण्यासाठी पूर्ण ताकद लावायचो. दगड एकमेकांवर ठेवून लगोरी तयार करायचो. एका फटक्यात ती फोडायचो मग ती लावायचो आणि बॉल आपल्याला लागेल म्हणून आपण धावत सुटायचो. कधी कधी आंब्याच्या झाडावरच्या कैऱ्या तोडायचो. लपाछपीमध्ये नवनवीन शक्कल लावायचो. खरंच किती छान होते लहानपणीचे दिवस हे आता जाणवते. लहानपणीच्या आठवणी तर आता दंतकथा झाल्यासारख्या वाटतात. कधी वाटतं लहाना व्हावे आणि मुक्तपणे आयुष्य जगावे. आता म्हणजे यंत्रमानवासारखे घडाळ्याच्या काट्यावर पळावे लागते. आला दिवस गेला दिवस म्हणून आठवडा पूर्ण करायचा.


लहानपणी मी खूप श्रीमंत होते कारण या पावसाच्या वाहणाऱ्या पाण्यात माझीपण २-३ जहाजे चालायची.... मोकळ्या हवेत कागदाची का असेनात पण स्वत:ची विमाने उडवायचे... भले चिखलाचा का असेना पण स्वत:चा किल्ला असायचा... आता हरवली ती श्रीमंती आणि हरवले ते बालपण... आज देखील विमानाचा आवाज आला आणि आकाशाकडे नजर केली तर समजायचं अजून आपल्याकडे बालपण शिल्लक आहे. आता मोठं झाल्यावर कळतंय खेळणी महाग नसतात, बालपण महाग असतं......

आठवतात ते गोड क्षण
लाड करतात सर्वजण
निखळ हास्य आणि निरागस मन
सांग ना रे देवा
देशील का ते परत बालपण....!

- शुभांगी राजेंद्र रणदिवे (टी.वाय.बी.कॉम.)

# चारोळ्या

मन गुंतायला वेळ लागत नाही
मन तुटायला वेळ लागत नाही
वेळ लागतो ते गुंतलेले मन
आवरायला आणि
तुटलेले मन सावरायला



झाडावरुन ओघळेली फुले
सर्वच उचलतात पण पाने
मात्र थोडीच माणसे उचलतात
मैत्री सारेच करतात पण
शेवट पर्यंत साथ काही जणच देतात.

# एकविसाव्या शतकातील स्त्री



पूर्वीच्या काळात चूल सांभाळण्यापासून तर आजच्या काळाच्या एखाद्या देशाची सत्ता सांभाळण्यापर्यंतचा स्त्री च्या प्रगतीचा हा प्रवास थक्क करणारा आहे. बदलत्या काळाने दिलेल्या संधीचा योग्यपणे उपयोग करुन, प्रत्येक वेळी स्वत:ला पुरुषांच्या बरोबरीने सिध्द करत स्त्री ने केलेली ही वाटचाल अद्भुत आहे.

सातत्याने बदलणारी व आधुनिकतेकडे सरकणारी सामाजिक परिस्थीती, स्त्रीयांचा शिक्षणात वाढलेला सहभाग आणि परिणामी मिळणारे वैचारीक स्वातंत्र्य व आर्थिक स्वावलंबता, पुरातन काळापासून आलेल्या संस्कृतीचा ऱ्हास व तत्कालीन परस्थितील अनुसरुन स्वत:मध्ये बदल करण्याचा मानवाचा स्वभाव ही स्त्री च्या प्रगतीची महत्त्वाची कारणे आहेत.

जास्त कार्यक्षमता, नीटनेटकेपणा, कोणतेही काम करण्याची क्षमता अशा गोष्टींमुळे स्त्रीया आज सर्व स्तरावर आघाडीची भूमिका पार पाडतांना दिसतात. देशातील महत्त्वाच्या शासकिय कार्यालयांमध्ये स्त्रियांना आरक्षण देण्याचा निर्णय नक्कीच योग्य आहे हे येणारा काळ सिद्ध करुन दाखविल्याशिवाय राहणार नाही. आज कायद्यात तिच्यासाठी अनेकानेक चांगल्या तरतुदी आहेत.

आजही कुटूंबाचा कणा स्त्री आहे आणि त्याचं कारण स्त्री ही जन्मदात्री आहे. तिला भले अबला वगैरे म्हणोत परंतु ती शक्तीमान आहे. कुटुंबाच्या रक्षणासाठी प्रसंगी ती जो लढा देते, तो इतर कदापी कोणालाही शक्य नाही. कुटुंबाचा पायी, कणा एवढंच कशाला तर प्रत्येक कुटुंबाचा जीवच स्त्रीमध्ये असतो.

आज कायद्यातील विविध तरतूदींची माहिती, त्याचा उपयोग करुन घेण्यासाठीची स्व:ची मानसिकता तिला तयार करावयाची आहे. या बाबत तिचा आत्मविश्वास जागवायचं काम आवश्यक आहे. आज करिअर घडविण्यासाठी ती धडपडतेय, निरनिराळ्या क्षेत्रातील संधी दोन्ही हात पसरुन तिला बोलावत आहेत. तिलाही वाटतंय **I can do it** नव्हे तर **I must do it.**

**can do it तर I must do it.**

जग एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुढे जात असतांना देखील काही देशांमध्ये स्त्रियांची परिस्थिती अजून सुद्धा हालाखीची असल्याचे जाणवते. समाज परिवर्तनाला विरोध करणाऱ्या कट्टर पंथी लोकांनी व्यापलेला समाज व त्यांचा उदारमतवादी पणाला असलेला विरोध आणि आर्थिक स्तरावर झालेली कमी प्रगती ही त्याची प्रमुख कारणे आहेत. मोठी लोकसंख्या असलेले देशच याला बळी पडत आहेत.

आज स्त्रीवर जे अत्याचार घडत आहेत, त्याला जबाबदार हा समाजच आहे. कारण आजही स्त्रीयांकडे बघण्याची दृष्टी बदललेली नाही. यासाठी स्त्रीयांनी सुध्दा काही गोष्टी आचरणात

आणणे गरजेचे आहे. जसे की, स्वत:चा पोशाख, हावभाव, आचरणातून चुकीचा संदेश जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. एकटीने प्रवास, वास्तव्य करतांना आवश्यक ती काळजी घेणे. कारण हा अन्याय शारीरीक आर्थिक, मानसिक, सामाजिक, कौटुंबिक, भावनिक सुद्धा असणार आहे.

स्वरक्षणासाठी तिला शारीरिकदृष्ट्या स्वत:ला फिट ठेवलंच पाहिजे. त्यासाठी ज्युदो, कराटे, लाठी शिक्षण घेणे निश्चत उपयुक्त ठरेल. उपलब्ध असलेल्या सुविधांचा सुयोग्य, समयोचित वापर करणे, नोकरीच्या ठिकाणी स्वत:च्या हक्काविषयी, अधिकाराविषयी माहिती घेणं, जागरुक राहणं, स्वत:ला अपडेट करणं हे ही तितकेच आवश्यक आहे. स्त्री केवळ शारीरिक दृष्ट्याच नव्हे तर मानसिकदृष्ट्या देखील सबळ असणे आवश्यक आहे. त्यासाठी महाविद्यालयात देखील विविध उपक्रम राबविले जातात. स्त्रीला भयमुक्त वातावरणात जगता यावे यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे.


महिलांवर होणारे अत्याचार, छेडछाडीची प्रकरणे व प्रदुषित सामाजिक पर्यावरणाचा प्रतिकूल परिणाम स्त्री च्या मनावर होतो. त्या भयाच्या वातावणात वाढतात. समाजामध्ये मोकळेपणाने वावरता येत नाही. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे आज तिचं अस्तित्वच चहू अंगाने नाकारायचा जो सर्वोतोपरी प्रयत्न चाललाय, तो नेटानं नेस्तनाबुत करायचा. अन्यायग्रस्त महिलेच्या पाठीशी केवळ तिच्या पालकांनीच नव्हे तर सर्व सखींनी, समाजाने उभे राहण्याची गरज आहे. मुळात अन्याय होणारच नाही याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्री ही कुणाची मुलगी, बहीण, आई, पत्नी असतेच ना. जोपर्यंत स्त्री म्हणजे उपभोग हा विचारच नष्ट होणार नाही तोपर्यंत समाजाची प्रगती होवूच शकणार नाही. समाज आणि देश यांचे अस्तित्व टिकवायचे असेल तर कुटूंब आणि स्त्री यांचे नातं ओळखून त्याप्रमाणे समाजव्यवस्था निर्माण करायला लागेल. स्त्रीमधील प्रचंड ऊर्जेला वाव द्यावा लागेल. अन्यथा ती ज्वालामुखीसारखी बाहेर यायला वेळ लागणार नाही. फरक एकच असेल, ज्वालामुखी विध्वंस करतो तर स्त्री काहीतरी विधायक करेल. या सर्व बाबींचा विचार केला तर तिला खरोखरंच अष्टभुजा दुर्गेचे रुप घ्यायचे आहे. मला वाटतं, हे सावित्रीबाईंच्या डोळ्यातले स्वप्न वास्तवात उतरतांना, हळुवारपणे पूर्णत्वास येतांना जाणवत आहे, आपणही आपल्या परीनं खारीचा वाटा उचलूया.


जाता जाता एवढेच, स्त्री ने देखील स्वत:ला कमजोर, लाचार, अबला न समजता येणाऱ्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जायचंय.


'' क्या हूँ मै, कौन कहू मैं, यही सवाल करती हूँ मै
लडकी हो लाचार, मजबूर, बेचारी हो यही जवाब सुनती हुँ मैं ।
बडी हुई जब समाज की रस्मों को पहचाना
अपने ही सवाल का जवाब तब मैनी खूद में पाया
लाचार नहीं, मजबूर नहीं, मैं एक धगधगती चिंगारी हूँ
छेडो मत जल जाओगे दुर्गा और काली हूँ में
जिसको माँ ने है बडे प्यार से पाला,
उस माॅ की बेटी हूँ मै,
सृष्टी की उत्पत्ती का प्रारंभिक बीज हूँ मै
नये – नये रिश्तों को बनाने वाली रित हूँ मै
जिसको हर मुश्कील में सँभाला,
उस पिता की बेटी हुँ मै, उस पिता की बेटी हूँ मै.

प्रा. ए.व्ही. दरेकर
(वाणिज्य विभाग)

# इलेक्ट्रॉनिक
## शाप कि वरदान ?





मोबाईल फोनचा जन्म झाला आणि जगात मोठी संपर्कक्रांती झाली. भारतात तर बघता बघता गरीब-श्रीमंत, मालक,कामगार, स्त्री-पुरुष सर्वांच्याच कानाला मोबाईल लागला. कारण त्याचा उपयोगच तसा होता. पण या उपयुक्त मोबाईलचा दूरुपयोग सुरु झाला. सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्या आवाजात संभाषण करणे, अश्लिल एस.एम.एस. पाठविणे, वाहने चालवितांना अपघात होण्याची तमा न बाळगता त्याचा वापर करणे वगैरे वगैरे. त्यामुळे मोबाईल जितका उपयुक्त ठरला. तितकाच उपद्रविही ठरला. मोबाईल कसा वापरावा ? केव्हा वापरावा, त्यावर कश्या पध्दतीने संभाषण करावे या बददल तुम्हाला काय वाटते ?

मोबाईलमुळे जगात क्रांती झाली हे खरेच ! तसं पाहिलं तर मोबाईल वरदानच ठरावा. कुठेही, कधींही आपल्याला आपल्या माणसांना, मित्रपरिवाराला आणिबाणीच्या वेळी महत्त्वाच्या कामावेळी मोबाईलमुळे सहजतेने संपर्क साधता येतो. आता मोबाईल सर्व स्तरातील माणसं वापरायला लागल्यामुळे त्याचा उपयोगा इतकाच दूरपयोगही होऊ लागला आहे. सार्वजनिक ठिकाणी वाहन चालवितांना मोबाइलवर बोलू नये. म्हणून शक्यतो मोबाईल वापरणाऱ्यांनी त्याच्या उपयुक्ततेचा विचार करुनच वापर करावा, त्याचा दुरुपयोग होऊन देऊ नये. तो शाप नसावा.

मोबाईल हा नेहमीच आपण सोबत बाळगु शकतो. त्यामुळे प्रवासात कोठेही असतो तरी आपल्या माणसांना कळविता येते. एकमेकांशी हवा तेव्हा संवाद साधता येतो. आनंदाच्या, दु:खाच्या बातम्या लगेचच कळविणे शक्य होते. तसेच संकटसमयी या फोन मुळे आपल्या मदत मिळते. याचाच अर्थ मोबाईल नक्कीच वरदान ठरतोय. मात्र मोबाईलचा अति वापर संकटाला आमंत्रण देतो. आपल्या रोजच्या धावत्या आयुष्यातील अनमोल वेळ अयोग्य ठिकाणी खर्ची करु नये हाच दृष्टीकोन नेहमी डोळ्यांसमोर ठेवावा.

पूर्वी फोन साठी दूर्गम खेड्यातून पंधरावीस मैल चालत जाऊन तालुक्याच्या गावी फोन असल्यास करता येत असे. आता जवळजवळ प्रत्येक खेड्यात अनेकांच्या हातात मोबाईल आहे. काही विकृत लोक मोबाईलचा दूरुपयोगही करतात. गाडी किंवा बाईक चालवितांना मोबाईल फोनचा वापर टाळावा म्हणजे अपघात होणार नाही. विकृत माणूस विकृती करणारच. वाईट गोष्टींना अंत नाही. ती प्रत्येकाच्या मानसिकतेवर अवलंबून असते. सध्यातरी मोबाईलन फोन हा वरदानच ठरला आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात मानवीजीवन सुसह्य करणाऱ्या मोबाईलचे अस्तित्व फार मोठं आहे.

मोबाईलमुळे एकमेकांशी संवाद साधणे, नातेसंबंध टिकविणे, वेळेची बचत तसेच व्यवहारात पारदर्शकता आली. मोबाईलमुळे फायदे झाले तसेच त्याच्या कितीतरीपट नूकसानही होत आहे. आजच्या तरुणाईला 'मॉल संस्कृती' व विविध कंपन्यांच्या स्पर्धेमुळे स्वच्छंदी जीवन जगायला मिळत आहे. सुखवस्तू कुटूंबातील व्यक्तिच नव्हे तर समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्ती या मोबाईलमुळे भ्रमिष्ट झाला आहे. लहानमुले सुध्दा मोबाईलवेडे होऊन अनेक समस्येला सामोरे जात आहेत. मोबाईलमधून उत्सर्जित होणाऱ्या किरणोत्सर्गापासून धोका आहे असे सांगितले जात आहे. मोबाईलचा गुलाम असणं हा मानसिक आजार आहे. तरुणांनी व लहान मुलांनी शक्यतो मोबाईलचा वापर कमीत कमी करावा असे मला वाटते....

– अरुणा सुनिल शिंदे (टी.वाय.बी.एस्सी.)







# बँकींग क्षेत्रातील आधुनिक प्रवाह

पारंपारिक बँकिंग आणि आधुनिक बँकिंग यात जमिन–आस्मानाचा फरक पडलेला आहे. पूर्वी बँका फक्त ठेवी गोळा करणे व या गोळा केलेल्या ठेवींच्या रकमेतून कर्ज देणे एवढेच काम करीत होत्या. या स्पर्धेच्या युगात टिकाव लागण्यासाठी व उत्पन्नाची साधने वाढावीत म्हणून आता बँका सर्वसाधारण विमा पॉलिसी विकतात. जीवन विमा पॉलिसी विकतात. म्युच्युअल फंडाच्या योजना विकतात. दस्तऐवजावर फ्रँकिंग करुन देतात. आता ग्राहकांना पैसे काढण्यासाठी बँकेतच यावं लागत नाही. ए.टी.एम. मधून ते केव्हाही व कधीही पैसे काढू शकतात. खरेदी करतांना रोकड खिशात असण्याचीही गरज नाही. या कार्डामार्फत खरेदीची बिले चुकविता येतात. भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे जी आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी प्रणाली राबविली जाते. त्यामार्फत भारतीय बँक ग्राहकाला आता भारताच्या एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात काही तासांत पैसे पाठविण्याची सुविधा उपलब्ध करुन देतात. अशी ही बदललेली बँकिंग व्यवस्था आता एका गमतीशीर वळणावर उभी आहे. रिझर्व्ह बँकेने चार राष्ट्रीय स्तरावरील बँकांची रचना असावी असे उद्दिष्ट ठरविले आहे.

१) आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मोठ्या बँका.

२) राष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या मोठ्या बँका.

३) प्रादेशिक बँका – देशात काम करणाऱ्या लहान बँका.

४) स्थानिक बँका – राज्यस्तरावर काम करणाऱ्या लहान बँका.

विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या बँकांची सध्याची रचना रिझर्व्ह बँकेने त्यात सुचित केलेले बदल, त्याची कारणे, त्याचे परिणाम तसेच जागतिक स्तरावर आपल्या बँकींग संस्थांना मान्यता याबाबत सकारात्मक बदल आवश्यक आहेत. यात तिसऱ्या प्रकारात बहुराज्यीय नागरी सहकारी बँका (मल्टी स्टेट अर्बन–को–ऑपरेटिव्ह बँक्स) तर चौथ्या प्रकारात एका राज्यात काम करणाऱ्या नागरी सहकारी बँकांचा समावेश आहे. रिझर्व्ह बँकेच्या मते या दोन्ही प्रकारच्या बँकांमध्ये ज्या बँका सक्षम आहेत त्यांनी व्यावसायिक बँका होण्याची संधी घ्यावी. याचा अर्थ असा लावता येईल , की ज्या बँका सक्षम नाही त्यांनी एकतर सक्षम व्हावे किंवा गाशा गुंडाळावा. कारण या व्यवस्थेत फक्त सक्षम बँकांनाचा फक्त स्थान राहिल. रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये सक्षम नागरी सहकारी बँकांचे निकष जाहिर केले आहेत. या निकषांवर न उतरणाऱ्या बँकांना या नवीन व्यवस्थेत अस्तित्वासाठी स्थान उरणार नाही. सक्षम बँकांना मात्र संधी आहे आणि व्यावसायिक किंवा व्यापारी तत्वावर बँका चालवून त्यांनी या संधीचे सोने करावे अशी रिझर्व्ह बँकेचे अपेक्षा आहे.

यात पहिला क्रमांक सारस्वत सहकारी बँकेचा लागेल. कारण या बँकेची आर्थिक उलाढाल आता एवढी वाढलेली आहे की ही बँक आता लवकरच सहकार क्षेत्रातून खाजगी क्षेत्रात प्रवेश करेल. व्यावसायिक तत्वावर बँक चालणे याचा अर्थ काय ? नागरी सहकारी क्षेत्रातील बँकांच्या क्षेत्रातील अनेक बँका आज अपूरे भांडवल, व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव, चुकीच्या पध्दतीने कर्ज मंजूरी, कर्ज वितरण, कर्ज व्यवस्थापन, उपलब्ध निधिचा दुरुपयोग अशा अनेक समस्यांनी ग्रस्त दिसतात. या समस्यांवरचा उपाय म्हणजे सर्व तऱ्हेच्या व्यवस्थापनात मग ते निधी व्यवस्थापन असो, कर्ज व्यवस्थापन असो सुधारणा करणे त्यासंबंधीच्या दृष्टीचा म्हणजे व्यावसायिक दृष्टीचा सर्व संबंधित घटकांमध्ये प्रसार करणे व साध्य म्हणून परिणामत: नफा क्षमता वाढविणे म्हणजे व्यावसायिक तत्वावर बँक चालविणे.

बँकांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम असावे व त्यांचे व्यवस्थापन उत्तम असावे असे सांगणे नागरी बँकांच्या सर्व घटकांच्या हिताचे आहे. मग ते भागधारक असोत, संचालक मंडळ असोत, बँकेचे ठेवीदार,
कर्जदार म्हणजेच ग्राहक असोत वा
कर्मचारी–अधिकारी असोत.

या बँकांनी केवळ व्यावसायिक विचार करावा असे सांगणे हेही व्यापकदृष्ट्या व्यावसायिकांच्या व व्यवसायाच्या हिताचेच आहे. यात सक्षम नसणाऱ्या बँकांना स्थान नसणे यात आयोग्य काही नाही. जगात सर्व व्यवसायात सर्व स्तरांवर स्पर्धा आहेच. स्पर्धेत दुबळे घटक मागे पडतात. हळूहळू संपतात, नष्ट होतात. ही जगन्मान्य रुढी आहे. बँकिंग हा व्यवसाय आहे. तेव्हा व्यवसायात टिकून राहण्यासाठी, स्थान मिळविण्यासाठी सक्षम राहणे हे महत्वाचे आहे. परिणामी नागरी सहकारी बँकांनी या बदलांबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवावयास हवा.

सध्या बँका विशेषत: सार्वजनिक उद्योगातील बँका या जनधन योजनेत खाते उघडण्याच्या कामाला जास्त प्राधान्य देत आहेत. या योजनेचा प्रारंभ होऊन काही महिनेच झाले पण आत्तापर्यंत या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत कोटीच्या संख्येने खाती उघडली गेली आहेत. बँकिंग व वित्तीय सेवा शहरात राहूनही वंचित असणाऱ्यांसाठी व खेडोपाडी, घरोघरी मिळावी हा या योजनेचा हेतू आहे. प्रत्येक व्यक्तीचा दर्जा उंचावणे, राहणीमान सुधारणे, व्यक्तीची पत वाढविणे यासाठी बँकिंग उद्योग कार्यरत झाला आहे. हे काम १९६७ पासून बँका करत आहेत. बँका सार्वजनिक उद्योगात आल्यानंतर बँकिंगचे रुप बदलले तेव्हापासून आतापर्यंत ते कशा न कश प्रकारचे बदलतच चालले आहे.

बँकांचे राष्ट्रीयकरण झाल्यानंतर ग्रामीण विकास योजने अंतर्गत जेव्हा एखादी बँक चार ग्रामीण शाखा उघडून कार्यरत होते. तेव्हाच त्या बँकेला शहरात एक शाखा काढायला परवानगी देत असे. याने ग्रामीण भागातील शाखांचे जाळे विस्तारले गेले. सेवाक्षेत्र दृष्टीकोन ही संकल्पना राबवून बँकेच्या एका शाखेला त्या गावाच्या आजूबाजूची खेडी जोडली गेली. काही खेडी बँकांनी दत्तक घेतली. आता देखील उरलेली खेडी दत्तक घेवून त्यांना सर्व प्रकारच्या सेव-सुविधा देण्याचा प्रयत्न चालू आहे. या योजने अंतर्गत ज्यांची बँक खाते आतापर्यंत नव्हती अशा लोकांची बँकेत बचत खाती काढायची, आर्थिक व्यवस्थेत ज्यांना दूर ठेवले गेले किंवा ज्यांना तशी संधी सुध्दा मिळाली नाही अशांना बँकिंगच्या विस्तृत परिघात सामावून घेऊन आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना सावकारीच्या कचाट्यातून बाहेर खेचून काढायचे व बँकेत आणायचे असे ठरले.

– पल्लवी सुनिल केरुळकर (एफ.वाय.बी.कॉम.)

# आई



आई, आ – आत्मा, ई – ईश्वर
आईचं असते या शब्दाचं भांडवलं ।
नऊ महिने पोटात वाढवून ते
दुखणं ती सहन करायची ।
मोठं झाल्यावर आपणचं तिच्या पोटात
लाथ मारुन परतफेड करायची ।।१।।
ताप आला आपल्याला
जवळ अशी बसायची ।
हवं नको ते सारखी
आपल्यासाठी बघायची ।।२।।
राब राब राबून दिवसभर
आपल्यासाठी जेवण ती करायची ।
मायेने हात फिरवून डोक्यावर
आपल्याला जेवण ती भरवायची ।।३।।
आपल्या डोळ्यांत पाणी आलं की
डोळ्यांत तिच्या पाणी यायचं ।
आपण काय झाल ?
विचारलं तर कचरा गेल्याचं सांगायच ।।४।।
एक दिवस आजारी ती पडली,
होतो तिच्या सोबत बसून ।
काय झालं मला माहितचं नव्हतं,
ती आजार सहन करत होती आतून ।।५।।
त्या शेवटच्या क्षणाला मिठी नाही
मारु शकलो गं तुला ।
का सोडून गेलीस गं तू वाऱ्यावर
मला एकट्याला ।।६।।

# मैत्री

आयुष्यात आपणास कोणाची
तरी सोबत हवी असते...
कधी मैत्री हवी असते
कधी प्रेम हवे असते
प्रेमाची साथ कधीही तुटते
पण...
मैत्री मात्र चिरकालीन असते
प्रेमाची साथ तुटल्यावर आयुष्य
विसकटते
पण मैत्री मात्र आयुष्याची घडी
घालते
कोणी कोणाच्या आयुष्यात
कायमचे राहत नाही...
जरा पाने उलटली की जुने काही
आठवत नाही.
आपण नसल्यास कोणाला आनंद
झाला तरी चालेल पण...
आपल्या अस्तित्वाने कोणाला
दु:ख होता कामा नये.
आपल्या सावलीपासुन आपणच
शिकावं...
कधी लहान जर कधी मोठे होऊन
जगावे,
शेवटी काय घेऊन जाणार आहोत ?
म्हणूनच मैत्रीचे हे सुंदर रोप
असेच जपावे...

मैत्री ही फुलाप्रमाणे असते
फुलता – फुलता फुलत जाते
मैत्रीच्या भावना असतात नाजुक
मैत्रीत असतो प्रेमाचा आसरा,
कारण एकमेकांना असतो
एकमेकांचा दिलासा...



नाती जपली की सगळं जमतं
हळूहळू का होईना कोणी आपलसं बनतं
ओखळ नसली तरी साथ देऊन जातं
मैत्रीचं नातं आयुष्यात खूप काही
शिकवुन जातं...

चांगले मित्र या जगात सहजासहजी मिळत नाहीत,
जवळ असतांना मात्र  एकमेकांशी पटत नाही...
कळत असतं सारं काही पण एक मात्र वळत नाही...
काय असते ती मैत्री ?
ते मित्र दूर गेल्याशिवाय कळत नाही
आणि गेलेले दिवस मात्र
कधीच परत येत नाही.


ना कुणाच्या अभावाने जगतो,
ना कुणाच्या प्रभावाने जगतो
अरे  जिंदगी अपनी है,
बस, आम्ही आमच्या स्वभावाने जगतो.

मैत्र असावी मना–मनाची,
मैत्री असावी जन्मा–जन्माची
मैत्री असावी प्रेम आणि त्यागाची.

गौरी विजय पंडित
एफ.वाय.बी.ए.

# आधुनिक भारत में हिंदी भाषा का महत्त्व

सागर में मिलती धाराएँ
हिंदी सबकी संगम है,
शब्द, नाद, लिपि से भीं आगे
एक भरोसा अनुपम है ।
गंगा कावेरी की धारा
साथ मिलाती हिंदी है,
पूरब-पश्चिम कमल-पंखुरी
सेतु बनाती हिंदी है ।



किसी भी स्वतंत्र राष्ट्र की अपनी एक भाषा होती है जो उसका गौरव होती है । राष्ट्रीय एकता और राष्ट्र के स्थायित्व के लिए राष्ट्रभाषा अनिवार्य रूप से होनी चाहिए जो किसी भी राष्ट्र के लिए महत्त्वपूर्ण होती है ।

निजभाषा उन्नति अहै, सब उन्नति कौ मूल ।
बिनु निज भाषा ज्ञान के, मिटे न हिय को सूल ।।

स्वतंत्रता प्राप्ति से पूर्व काँग्रेस ने यह निर्णय लिया था की स्वतंत्रता प्राप्ति के बाद भारत की राजभाषा हिंदी होगी । स्वतंत्र भारत का संविधान सभा ने १४ सितम्बर १९४९ को ही हिंदी भाषा को भारत संघ की राजभाषा के रूप में मान्यता दे दी ।

किसी भी भाषा को राष्ट्रभाषा बनने के लिए उसमें सर्वव्यापकता, प्रचुर साहित्य रचना, बनावट की दृष्टि से सरलता और वैज्ञानिकता, सब प्रकार के भावों को प्रकट करने की सामर्थ्य आदि गुण होने अनिवार्य होते है । यह सभी गुण हिंदी भाषा में है ।

